नवी लेखमाला
**न्यायदेवतेच्या (न लिहिलेल्या) डायरीतून**
प्रतापसिंह साळुंके

साप्ताहिक
संस्थापक : साने गुरुजी

# साधना

**Weekly Sadhana**
Date of issue
शनिवार, ११ जानेवारी २०२०
मूल्य रु. २० (एकूण पृष्ठे : ४४)

## १९१९ चा काळा कायदा (रौलेट ॲक्ट) रद्द झाला होता, २०१९ चा काळा कायदा (सीएए) रद्द झालाच पाहिजे!

संपादकीय



२१ ते ३० डिसेंबर या दहा दिवसांत नागपूर येथे
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने 'युगांतर' व्याख्यानमाला आयोजित केली होती.
सुरेश द्वादशीवार या एकाच वक्त्याने ही दहा व्याख्याने दिली.
त्या व्याख्यानांचे व्हिडिओ लवकरच यू-ट्यूबवर उपलब्ध होणार आहेत.
तो संपूर्ण आशय या पुस्तकात शब्दबद्ध झालेला आहे.

मोठ्या प्रमाणात
खरेदी करून
भेट द्यावीत
अशी पुस्तके
फार थोडी असतात,
हे त्यापैकी
एक आहे!




व्यक्ती
समष्टी
धर्म
नीती
न्याय
स्वातंत्र्य
समता
बंधुता
राजकारण
सेक्युलॅरिझम
लोकशाही

कूळ, जात, वर्ण, धर्म, जन्मस्थान वा देश याविषयी व्यक्तीला वाटणारे प्रेम वा निष्ठा जन्मदत्त स्वरूपाच्या असतात, त्या जन्माने मिळतात. याउलट न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, नीती व लोकशाही या मूल्यांविषयीच्या निष्ठा प्रयत्नपूर्वक आत्मसात कराव्या लागतात. जन्मदत्त निष्ठा बलवत्तर दिसल्या तरी कालांतराने त्या दुबळ्या होतात आणि समाज प्रगल्भ मूल्यनिष्ठांकडे जातो. जन्मदत्त निष्ठांकडून मूल्यनिष्ठांकडे जाणे याचेच नाव प्रबोधन आहे व तेच समाजाचे खरे उन्नयनही आहे. 'युगांतर'मध्ये या स्थित्यंतराचा विस्तृत आढावा प्रमाणांसह घेतला आहे.

पृष्ठे १२८ | किंमत रुपये १२५ | सवलतीत १०० रुपये (ट. ख. वेगळा)
१० किंवा अधिक प्रती खरेदी केल्यास ४० टक्के सवलत (ट. ख. वेगळा)

साधना प्रकाशन
४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३० फोन ०२०-२४४५१६३५
sadhana.prakashan@gmail.com

संस्थापक संपादक : साने गुरुजी

Date of issue
११ जानेवारी २०२०
वर्ष ७२ / अंक - २२

संपादक :
विनोद शिरसाठ

**सहयोगी संपादक मंडळ :**
अभय टिळक
अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव
रझिया पटेल

मुखपृष्ठ मांडणी :
गिरीश सहस्रबुद्धे

अक्षररचना :
सुरेश माने

मुद्रितशोधन :
मिलिंद बोरकर

'साधना' हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी, आनंद लाटकर कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा.लि., २५/१, यशगंगा इंड. इस्टेट प्रा.लि., वडगाव बु।।, पुणे ४११०४१ येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०** येथे प्रसिद्ध केले.
Ph.: 020-24451724 /
Mob.: 7028257757
weeklysadhana@gmail.com/
www.weeklysadhana.in

**साधना मीडिया सेंटर (पुस्तक विक्री केंद्र),**
Ph. : 020-24459635

साप्ताहिकाची वार्षिक वर्गणी :
**एक वर्षासाठी : ८०० रुपये,**
**दोन वर्षांसाठी : १६०० रुपये,**
**तीन वर्षांसाठी : २४०० रुपये**

(अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

(अंकातील छायाचित्रे इंटरनेटवरून साभार.)

# अनुक्रम

४ । संपादकीय
**मानवता मोठी की धर्म?**

६ । **संविधान कशासाठी? कुणासाठी?**
प्रतापसिंह साळुंके

११ । **कॉमिसार डेंग**
सतीश बागल

१७ । **नागडा नायक आणि तिरकस म्हातारे**
मीना कर्णिक

२५ । **कोल्हापूर येथील चर्चासत्र**
नंदकुमार मोरे

३१ । **त्यांनी गिळावे सूर्यासी**
अतुल देऊळगावकर

३६ । **प्रेमदिवाणी - मीरा (मार्गारेट स्लेड)**
संजीवनी खेर

४१ । **मला भेटलेला देवदूत**
वसंत आळेकर



स्थापण्या समता शांती ठेवुनी शुद्ध साधना । करिती साधना त्यांना ठेवी उत्स्फूर्त साधना ।।

संपादकीय

# मानवता मोठी की धर्म ?

३१ डिसेंबर २०१९ रोजी हा अंक छापायला गेला, त्यामुळे सरत्या वर्षातील प्रमुख राजकीय, सामाजिक घटनांचा पट समोर आला. त्यात सर्वांत अलीकडची आणि देशाच्या दृष्टीने सर्वाधिक धोकादायक घटना म्हणून नागरिकत्व सुधारणा कायदा (CAA : Citizenship Amendment Act) ठळकपणे पुढे आला. १२ डिसेंबरला हा कायदा संसदेत मंजूर झाला आणि त्यावर राष्ट्रपतींची स्वाक्षरीही झाली. म्हणजे केंद्र सरकारने त्याची अधिकृत अंमलबजावणी करण्यासाठीचे परिपत्रक काढणे तेवढे बाकी आहे. मात्र मागील तीन आठवड्यांपासून देशभरातील प्रमुख शहरांमध्ये या कायद्याच्या विरोधातील आंदोलने चालू आहेत. आणि म्हणून बरोबर शंभर वर्षांपूर्वी ब्रिटिश सत्तेने केलेल्या एका कायद्याची आठवण झाली.

The Aarchical and Revolutionary Act मार्च १९१९ मध्ये न्या.सिडने रौलेट कमिटीच्या शिफारसीनुसार केला गेला होता. म्हणून तो रौलेट ॲक्ट याच नावाने ओळखला गेला. पहिले महायुद्ध संपले होते आणि भारतात राजकीय असंतोष जोर पकडणार होता, त्या पार्श्वभूमीवर तो कायदा आला होता. त्यानुसार कोणत्याही भारतीय व्यक्तीला विनाचौकशी पकडण्याचा व विनाखटला दोन वर्षांपर्यंत तुरुंगात टाकण्याचा अधिकार पोलीस प्रशासनाला प्राप्त झाला होता. म्हणजे देशविघातक कृत्य करण्याची शक्यता असलेल्या किंवा तसा संशय असलेल्या कोणालाही त्या कायद्यानुसार अटक करता येणार होती. त्यासाठी कोणतेही पुरावे देण्याचे बंधन पोलिसांवर नव्हते. तो कायदा अतिशय घाईघाईत केला गेला होता, त्यामुळे त्याचे किती घातक परिणाम होऊ शकतात याचा अंदाज लगेच फार लोकांना आला नव्हता. महिनाभरानंतर महात्मा गांधी यांनी मुंबईच्या समुद्रात स्थान करून, उपस्थित छोट्या समूहासमोर केलेल्या भाषणात, त्या कायद्याच्या विरोधात देशव्यापी सत्याग्रह करण्याची हाक दिली. मग एप्रिल १९१९ मध्ये देशभर हरताळ पाळण्यात आला. पण त्याच दरम्यान काही हिंसक घटनाही घडल्या, म्हणून (अहिंसक लढ्यासाठी जनतेची तयारी झालेली नाही असे सांगून) गांधीजींनी ते आंदोलन स्थगित करीत असल्याचे जाहीर केले. त्यानंतरही देशभर असंतोष व उद्रेक चालूच राहिले. जालियनवाला बागेतील हत्याकांड घडले तेही त्याच काळात. त्यानंतर गांधीजींनी देशभर फिरायला सुरुवात केली आणि त्या कायद्याच्या धोक्याविषयी जनमानस घडवण्यासाठी विविध स्तरांवर आघाड्या उघडल्या. सविनय कायदेभंगाची चळवळ/ असहकाराचे आंदोलन त्यातून आकाराला आले. उपोषण, प्रार्थना, मोर्चे, निषेधसभा, व्याख्याने, चर्चासत्रे अशा अनेक मार्गांनी ती चळवळी चालू होती. सुरुवातीला मुंबई, दिल्ली, मद्रास, कलकत्ता अशा महानगरांपुरतीच ती चळवळ होती. मग देशातील अन्य मोठ्या शहरांमध्ये तिचे लोण पसरले. हळूहळू लहान शहरे आणि मग खेडेगावांमध्येही ते लोण पसरत गेले. जनतेला हा कायदा नेमका काय आहे, तो देशविघातक का आहे, त्याचे नेमके परिणाम काय होणार आहेत हे कळायला वेळ लागणारच होता. कारण 'देशाच्या विरोधी वर्तन सर्वसामान्य माणसे कशाला करतील, मग त्यांनी अटक होण्याची भीती का बाळगावी' असा सवाल त्यावेळी ब्रिटिश सत्तेचे समर्थक करीत होते आणि देशातील तटस्थ समजली जाणारी माणसे त्यांवर विश्वास ठेवून होती. परिणामी त्या कायद्याचे स्वरूप जनतेला समजावून सांगण्यासाठी, त्या कायद्याच्या विरोधातील आंदोलन पुढील तीन वर्षे चालू राहिले. दरम्यानच्या काळात ब्रिटिश सरकारने त्या कायद्याच्या पुनर्विचारासाठी समिती नेमली आणि मार्च १९२२ मध्ये रौलेट कायदा व आणखी २१ कायदे रद्द करीत असल्याचे जाहीर केले. त्या कायद्याच्या विरोधातील आंदोलनाने या देशात गांधीयुग अवतरले. विशेष

म्हणजे त्या कायद्याच्या विरोधात जनमत इतके क्रमाक्रमाने तापत गेले की, त्या कायद्याची अंमलबजावणी प्रत्यक्षात कधीच झाली नाही.

आता २०१९ हे वर्ष संपले आहे. १९१९ च्या रौलेट कायद्याचा आताच्या नागरिकत्व सुधारणा कायद्याशी थेट संबंध आहे, असे इथे सुचवायचे नाही. आताचा नागरिकत्व सुधारणा कायदा तसाच देशविघातक आहे आणि त्यासाठी दीर्घकाळ लढा द्यावा लागेल, हे इथे सांगायचे आहे. यावर विविध मतमतांतरे आहेत. त्यावर जरूर चर्चा, वाद करावेत. सर्व समर्थकांनीही आपापल्या बाजू मोठ्या हिरीरीने जरूर मांडत राहावे. कारण आताच्या या कायद्यातही वरवर पाहणाऱ्यांना काहीच चुकीचे आढळणार नाही. आणि सर्वसामान्य जनतेला तर या कायद्यात नेमके काय वाईट आहे किंवा याचे परिणाम काय होऊ शकतात हे इतक्या लवकर कळणार नाही. सर्व प्रकारच्या प्रसारमाध्यमांचा सुळसुळाट झाला असला आणि देशभरातील साठ कोटी लोकांकडे स्मार्ट फोन व इंटरनेट आहे, तरीही आताचा कायदा या देशातील सहा कोटी लोकांनाही नीट कळलेलाच नाही. कारण मुळात हा कायदा आणला घाईघाईत, दुसरे म्हणजे कायद्याची परिभाषा भल्याभल्यांनाही कळायला अवघड आणि त्यातील तरतुदीत दृश्य रूपात तरी नकारात्मक असे काही नाही. त्यामुळे त्याचे खरेखुरे स्वरूप आणि त्याचे दीर्घकालीन परिणाम काय होतील याबाबतची जनजागृती दीर्घकाळ व सातत्याने चालू ठेवावी लागेल. याचा संबंध भारताच्या संविधानाच्या मूळ चौकटीला छेद देण्याशी कसा आहे, हे जनमानसावर ठसवावे लागेल.

साधनाच्या याआधीच्या अंकात 'अंतिम सत्ता (संसदेची नाही) जनतेची!' या शीर्षकाचे संपादकीय लिहिले आहे, त्यात सविस्तर भूमिका येऊन गेली आहे. कायद्याला विरोध का करायचा त्याची तात्त्विक व व्यावहारिक कारणेही त्यात आली आहेत. त्यामुळे त्याची पुनरावृत्ती येथे करण्याची गरज नाही. मात्र गाभाघटक ठसवायचा आहे तो हाच की, 'धर्माच्या आधारावर नागरिकत्व देऊ करणारा देश' ही भारताची प्रतिमा जगात निर्माण होऊ देता कामा नये! त्यासाठी देशातील प्रत्येक नागरिकाने कंबर कसली पाहिजे. आताच्या नागरिकत्व सुधारणा कायद्यानुसार पाकिस्तान, अफगाणिस्तान व बांगलादेश या तीन देशांतून आलेल्या बेकायदा निर्वासितांमधील हिंदू, शीख, जैन, बौद्ध, ख्रिश्चन व पारशी या सहा धर्मांतील लोकांना भारताचे नागरिकत्व मिळू शकेल; याचाच अर्थ फक्त मुस्लिमांना भारताचे नागरिकत्व मिळणार नाही. एवढा एक मुद्दा घेऊन देशभर जनजागृती व्हायला हवी. बेकायदा निर्वासितांना नागरिकत्व देण्यासाठी नियम शिथिल करताना मानवतेचा निकष लावला आहे, असा एकमेव युक्तिवाद केंद्र सरकार करीत आहे. तर मग मानवता मोठी आहे की धर्म मोठा आहे, या प्रश्नाचे उत्तर भारताच्या विद्यमान पंतप्रधानांनी व कायद्याच्या समर्थकांनी द्यायला हवे. आपला देश किती निर्वासितांना सामावून घेणार ही मोठी व्यावहारिक अडचण आहेच, पण म्हणूनच सरसकट सर्वांना सामावून घ्या अशी मागणी कोणीही केलेली नाही. नागरिकत्व देण्यासाठी जरूर निकष लावावेत. पण ते जात, धर्म, भाषा, लिंग, वंश इत्यादी प्रकारचे नसावेत. कारण हे सर्वच निकष मानवतेच्या विरोधातच जाणारे आहेत.

अशा पार्श्वभूमीवर २०२० या वर्षाचे आगमन होत आहे. आज देशातील प्रमुख महानगरांमधून या कायद्याच्या विरोधातील आंदोलने होत आहेत. यानंतर ते लोण लहान शहरे व खेड्यापाड्यांपर्यंत जायला हवे. शांततेच्या/सनदशीर मार्गाने व अहिंसक पद्धतीनेच ही आंदोलने व्हायला हवीत. भारतीय संविधानाने हिंसा करण्याचा अधिकार फक्त राज्यसंस्थेला (स्टेटला) दिलेला आहे. देशाची अखंडता व सुरक्षितता राखण्यासाठी पोलीसदल व सैन्यदल यांच्या साह्याने आणि अर्थातच न्यायसंस्थेच्या अधीन राहून अशी अपरिहार्य हिंसा करण्याचा तो अधिकार राज्यसंस्थेला आहे. तो अधिकार कोणत्याही अन्य संस्थेला नाही, समूहाला नाही आणि नागरिकांनाही नाही, याचे भान प्रत्येक आंदोलनकर्त्याने ठेवलेच पाहिजे. गांधीजी म्हणायचे, ''अहिंसा हे माझ्यासाठी तत्त्व आहे, तुम्ही व्यवहार म्हणून तरी तिचा स्वीकार करा.'' त्यांचे हे म्हणणे व्यक्तिगत जीवनात जेवढे उपयुक्त आहे, त्याहून अधिक सार्वजनिक जीवनासाठी उपयुक्त आहे. सारांश, अहिंसक पद्धतीने हे आंदोलन चालत राहिले आणि क्रमाक्रमाने ते सर्वदूर पसरत गेले तर पुढील तीन महिन्यांत हा कायदा मागे घेतला जाऊ शकतो. रौलेट कायदा तीन वर्षांनी मागे घेतला गेला होता, कारण ती परकीय सत्ता होती; आता आपण प्रजासत्ताक भारतात आहोत!

न्यायदेवतेच्या
(न लिहिलेल्या) डायरीतून

प्रतापसिंह साळुंके

# संविधान कशासाठी ? कुणासाठी ?

ग्रेनव्हिल ऑस्टिन यांनी 'वर्किंग ऑफ डेमोक्रॅटिक कॉन्स्टिट्युशन अ हिस्टरी ऑफ इंडियन एक्सपीरिअन्स' या ग्रंथात भारतीय संविधानाचा प्रवास अनोख्या पद्धतीने शब्दबद्ध केला आहे. २६ जानेवारी १९५० या दिवसापासून या पुस्तकाची सुरुवात होते आणि १९८० सालापर्यंतचा प्रवास शब्दबद्ध करते. एखाद्याने आपल्या व्यक्तिगत डायरीत संविधानाच्या बाबतीत रोज काय घडले, याची काळजीपूर्वक नोंद ठेवावी अशा स्वरूपात हे पुस्तक लिहिले आहे. याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे– भारतीय संविधानाविषयी अतिशय अधिकृत समजले जाणारे हे पुस्तक लिहिणारे ग्रेनव्हिल ऑस्टिन काही लौकिक अर्थाने वकील वा कायदेतज्ज्ञ नाहीत. ते मूळचे इतिहासकार आहेत. भारतीय संविधानाचा इतिहास लिहावा, या मर्यादित उद्देशाने त्यांनी ते पुस्तक लिहिले. पण त्यांचे भारतीय संविधानाचे आणि भारतीय समाजमनाचे आकलन इतके मूलगामी आहे की, इतिहासाचा दस्तऐवज संविधानाच्या आकलनाचे महत्त्वाचे साधन बनला!

दिडशे वर्षांच्या ब्रिटिश राजवटीनंतर भारत एक सार्वभौम-प्रजासत्ताक लोकशाही राष्ट्र म्हणून उदयाला येणे जितके क्रांतिकारक होते, तितकेच या स्वतंत्र राष्ट्राच्या पुढील प्रवासासाठी संविधान केंद्रस्थानी असणे हेही होते. पण त्यावर राज्यशास्त्रज्ञ वा विधिज्ञांमध्ये जितकी चर्चा अपेक्षित होती, तितकी झाली नाही. संविधान केवळ एक कायदा म्हणूनच महत्त्वाचे आहे असे नाही, तर ते जी एक संरचना असण्याचा आग्रह धरते, त्यामुळे दैनंदिन कारभाराच्या पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल होणार होता. तसे पाहिले तर भारतासारख्या देशामध्ये कायदे असणे हा काही कौतुकाचा वा कुतूहलाचा भाग असू शकत नाही. आजच्या घडीला देशात साधारण पाच हजार केंद्रीय कायदे अस्तित्वात आहेत. केंद्रीय कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावर किमान एक कायदा अस्तित्वात येतो. म्हणजे २९ राज्यांचे मिळून साधारणतः एक लाख पंचेचाळीस हजार कायदे अस्तित्वात आहेत. शिवाय तितकेच कायदे राज्यसूचीमध्ये असणाऱ्या विषयांवर आहेत. याशिवाय १९७४ ते १९७८ या कालावधीमध्ये प्रशासनाने बनविलेल्या कायद्यांची संख्या पंचवीस हजार इतकी प्रचंड होती. सरासरी ६२५० याप्रमाणे सत्तर वर्षांमध्ये ४,३७,५०० कायदे प्रशासनाने बनविले आहेत. कायद्यांची संख्या इतकी प्रचंड असताना आणखी एक कायदा– ज्याला आपण संविधान म्हणतो, तो– असणे खरोखरीच आवश्यक आहे का?

हार्वर्ड विद्यापीठातील प्राध्यापक मार्क तुशनेट यांनी 'संविधान का महत्त्वाचे असते?' या नावाने एक महत्त्वपूर्ण पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकाच्या माध्यमातून त्यांनी, देशातील नागरिकांच्या दृष्टीने संविधान का व किती महत्त्वाचे असते याचा धांडोळा घेतला आहे. त्या पुस्तकाची मध्यवर्ती संकल्पना अशी आहे की– संविधान महत्त्वाचे ठरते कारण, ते राजकीय व्यवस्थेला एक संरचना प्रदान करते. त्या पुस्तकात ते फक्त संविधान का महत्त्वाचे आहे इतकेच सांगत नाहीत; तर ते कसे महत्त्वाचे आहे, हेही विशद करतात. न्यायव्यवस्थेने संविधानाला आकार देण्यात काही योगदान दिले आहे का, या प्रश्नाचा शोधही या

पुस्तकात ते घेतात. सर्वसाधारणपणे असा समज असतो की, न्यायव्यवस्थेकडून संविधानाला अतिशय सकारात्मक आणि हेतुपुरस्पर आकार दिला जातो. पण हे गृहीतक चुकीचे असल्याचे ते मानतात. महत्त्वाच्या शासकीय योजना 'सांविधानिक निवड' या सदरात न मोडता 'राजकीय निवड' या सदरात मोडत असल्याचे ते नमूद करतात.

जे प्रभावशाली नाहीत, त्यांनाच न्यायालयाचे आकर्षण असते, असा एक निष्कर्ष तुशनेट यांच्या पुस्तकात काढला आहे. संविधानिक हक्कांचा आशय हा राजकीय प्रश्न असतो; जो न्यायालयाच्या माध्यमातून सोडवण्यापेक्षा राजकीय पक्षांच्या माध्यमातून सोडविणे हा अधिक शाश्वत मार्ग असू शकतो, असेही ते नमूद करतात. संविधानातील तरतुदी आणि न्यायिक तत्त्वे सर्वसामान्य नागरिकांच्या आयुष्यावर फारसा प्रभाव टाकत नाहीत, उलट राजकीय पक्षांनी हाती घेतलेले कार्यक्रम सर्वसामान्यांच्या आयुष्याला जास्त प्रमाणात प्रभावित करतात, असे निरीक्षण तुशनेट नोंदवतात. सर्वसामान्य लोकांना प्रक्रियेपेक्षा अंतिम निकाल व परिणाम जास्त महत्त्वाचा असतो, असे ते मानतात. न्यायालयांनाही आपल्या मर्यादांची पूर्ण जाणीव असल्यामुळे शक्यतो राजकीय प्रश्नांवर न्यायालये हस्तक्षेप न करण्याचे पथ्य पाळतात, असे मत ते अधोरेखित करतात; परंतु हे इतक्या सरधोपटपणे घडत नाही. न्यायालयाला ज्या वेळी आपल्या कार्यकक्षा रुंदावून काही भूमिका घ्यायची असते, त्या वेळी ते संविधानाच्या मूलभूत तत्त्वांचाच आधार घेणे सर्वांत सुरक्षित मानतात. कारण आपली भूमिका जर संविधानाच्या चौकटीत मांडता आली, तर सर्वसामान्यांचाही त्या भूमिकेला पाठिंबा मिळू शकतो, हे ते जाणतात. त्यामुळे न्यायालयीन निष्कर्ष हे विशुद्ध न्यायिक तत्त्वांवरच आधारित असतात, असे मानणे ही अंधश्रद्धा ठरू शकते. न्यायालयेही काही अटीतटीच्या खटल्यात वेळ, प्रसंग पाहून, राजकीय सोय-गैरसोय डोळ्यांसमोर ठेवून निर्णय घेत असतात. म्हणजे न्यायालये फक्त न्यायिक वा कायदेशीर बाबींवरच निर्णय घेतात, या गृहीतकाला तडा देणारे न्यायालयाच्या इतिहासातील अनेक प्रसंग नमूद करता येतील. फरक इतकाच आहे की, राजकीय पक्षांच्या भूमिकांचे विश्लेषण जितक्या उच्चरवात होते तितके न्यायालयीन भूमिकांचे होत नाही.

ग्रेनव्हिल ऑस्टिन



याची तीन प्रमुख कारणे सांगता येतील. पहिले कारण आहे– न्यायालयाबद्दल सर्वसामान्यांच्या मनात असा अतूट विश्वास असतो की, ते जो निर्णय देतील तो नि:स्पृह, निःपक्षपाती आणि न्यायिक समतोल राखणारा असेल. त्यामुळे न्यायालयाच्या हेतूबद्दल शंका उपस्थित करणे धारिष्ट्याचे ठरत असते. दुसरे कारण न्यायालयीन प्रक्रियेतील गुंतागुंत ही इतकी बहुपदरी असते की, अमुक एक निवाडा एका विशिष्ट पद्धतीने हाताळण्याचे वा त्यात निर्णय देण्याचे हेच एकमेव कारण आहे, असे सांगणे अवघड असते. त्यामुळे त्या गुंतागुंतीचे समग्र आकलन झाल्याचा आत्मविश्वास तत्काळ येणे तितके सोपे नसते. तिसरे कारण– जे तुम्ही सबळ पुरावे देऊन सिद्ध करू शकत नाही, त्यावर भाष्य केल्यास न्यायालयीन अवमान होण्याची शक्यता असते, त्याची एक अदृश्य दहशत असते. त्यामुळे जे तुम्ही पुराव्यांच्या आधारे सिद्ध करू शकत नाही, त्याची चर्चा मूळ प्रवाहातील माध्यमांमधून होण्याऐवजी दबक्या आवाजात कुजबूर होत असते. पण त्याला अधिकृतता लाभत नाही.

मार्क तुशनेटच्या मांडणीला छेद देणारी मांडणी चार्ल्स फ्राईड यांनी 'सेईंग व्हॉट द लॉ इज द कॉन्स्टिट्युशन इन द सुप्रिम कोर्ट' या पुस्तकात केली आहे. जर सरकारच्या अधिकारांवर काही मर्यादा असतील तरच व्यक्तीचे अधिकार सुरक्षित राहू शकतात, हा सिद्धांत ते मांडतात. अमेरिकेच्या संविधानाचा इतिहास पाहता, २१४ वर्षांच्या इतिहासात १०८ न्यायाधीशांनी, अमेरिकन संविधानाचा अर्थ काय असावा यावर प्रभाव टाकलेला असल्याचे निरीक्षण ते नोंदवतात. एवढ्या मोठ्या कार्यकाळात एवढे कमी न्यायाधीश असण्याचे कारण म्हणजे, अमेरिकेतील न्यायाधीशांची नियुक्ती तहयात या तत्त्वावर आधारित असते, म्हणजे शारीरिक क्षमता असेपर्यंत न्यायाधीशांनी योगदान दिले आहे. त्यामुळे त्यात बऱ्यापैकी सातत्य व दूरदृष्टीने घेतलेल्या काही भूमिका यांच्या पाऊलखुणा पाहायला मिळतात. शिवाय, अमेरिकन नागरिकांचीही न्यायालयाकडून सातत्याची, एकसंधतेची, उत्तरदायित्वाची व संस्थात्मक प्रामाणिकतेची अपेक्षा कायमच राहिली आहे. आणि अमेरिकन न्यायालयांनीही नागरिकांच्या या अपेक्षांना सहसा तडा जाऊ दिला नाही. तेथील सर्वोच्च न्यायालयांचे अनेक महत्त्वपूर्ण निवाडे हे सामाजिक बदलांची नांदी ठरले आहेत. १९७३ मध्ये दिलेल्या एका निवड्यातून गर्भपात ही महिलेच्या आरोग्याशी संबंधित बाब असल्याने तो तिचाच मूलभूत अधिकार असल्याचे निःसंदिग्धपणे अधोरेखित केले होते. वास्तविक पाहता, हा अधिकार राजकीय चळवळीतून नागरिकांना मिळायला हवा होता. पण सर्वच राजकीय पक्ष हे राजकीय सोय–गैरसोय व्यक्तीच्या अधिकारापेक्षा जास्त महत्त्वाची मानत राहिल्यामुळे शेवटी न्यायालयालाच हस्तक्षेप करून तो अधिकार नागरिकांना मिळवून द्यावा लागला. तेथील न्यायाधीशांची निवड जरी राजकीय पक्षांच्या मतदानातून होत असली, तरी प्रत्येक निर्णयाला ते लोकांप्रति उत्तरदायी नसण्याचा एका चांगल्या अर्थाने फायदा हा राजकीय धुरिणांनी घेतल्याचे मानव्यशाखेचे काही अभ्यासक मानतात. आपण राजकीय पक्ष म्हणून काही भूमिका घेतली आणि ती दीर्घकालीन जनहिताची असूनही तत्कालीन लोकभावनेच्या विरुद्ध जाणारी असल्यास, दूरदृष्टीचे राजकीय धुरिणे तो निवाडा न्यायालयात पोहोचेल असे पाहतात. न्यायालयांनी जनहिताचा निर्णय घेतल्यानंतर संविधानाचा अंतिम अर्थ लावण्याची न्यायालयांची क्षमता निर्विवाद असल्याचे कारण पुढे करून, त्या निर्णयात हस्तक्षेप न करण्याचा धोरणीपणा अमेरिकन राजकीय पक्ष दाखवतात. तसे दाखले अनेक अभ्यासक देत असतात. (१९८६ मध्ये शाहबानो प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने अतिशय क्रांतिकारी निर्णय देऊनही केवळ तत्कालीन जनभावनेच्या दबावाला प्रचंड (काहींच्या मते पाशवी) बहुमतात असलेले केंद्र सरकारही कसे झुकले होते, हे भारतीय सामाजिक चळवळींच्या इतिहासात मोठ्या खेदाने नमूद करावे लागते.)

रोहित डे यांनी भारतीय संविधानावर लिहिलेल्या 'अ पीपल्स कॉन्स्टिट्युशन द एव्हरीडे लाईफ ऑफ लॉ इन द इंडियन रिपब्लिक' या पुस्तकात खूप महत्त्वाची निरीक्षणे नोंदवली आहेत. संविधान म्हणजे केवळ बुद्धिवादी मंडळींनाच कळू शकते– असे काही तरी अगम्य व समजायला अतिशय अवघड आणि त्याचा वापर तर फक्त अतिश्रीमंत वा अतिशय प्रभावशाली व्यक्तीच करू शकतात, अशी काही गैरसमजांची पुटे निर्माण होऊ नयेत, असा प्रयत्न या पुस्तकातून केला आहे. ज्या काही प्रचलित गैरसमजांना दूर करण्याचा प्रयत्न या पुस्तकातून केला आहे, त्यापैकी पहिला गैरसमज म्हणजे– भारतीय संविधान हे अतिश्रीमंत वा अतिशय प्रभावशाली व्यक्तींनीच बनविलेले

आहे आणि त्याचा भारतीय समाजमनावर कोणताही, कसलाही परिणाम झालेला नाही. या पुस्तकात डे यांनी भारतीय समाजातील सर्वसामान्य समजल्या गेलेल्या काही समाजघटकांनी संविधानाचा वापर करून सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला कसा हातभार लावला याचा लेखाजोखा दिलेला आहे. त्यात चार महत्त्वाच्या खटल्यांचा संदर्भ देऊन संविधान केंद्रस्थानी असणे महत्त्वाचे का असते याचे विश्लेषण केले आहे. एका पारशी पत्रकाराने नव्या धोरणानुसार दारूबंदी करण्याच्या कृतीला, एका लहान मारवाडी व्यापाऱ्याने व्यवसाय नियंत्रित करण्याच्या कृतीला, कत्तलखाना चालविणाऱ्या मुस्लिम व्यक्तीने (गोरक्षणाच्या धोरणामुळे माझे उदरनिर्वाहाचे साधन धोक्यात आले) गोरक्षणाच्या धोरणाला, देहविक्रय करणाऱ्या वेश्येने (त्या व्यवसाय करण्याचा मूलभूत अधिकार असल्याने अधिकाराला बाधा आणणाऱ्या पोलिसांच्या कृतीला) सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. असे ते चार खटले होत. म्हणजे सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करणे ही काही मूठभर अभिजन वर्गाची मक्तेदारी नाही, तर आपले रोजचे जगणे अधिक सुकर करण्यासाठी सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालये अतिशय प्रभावीपणे वापरता येतात, हे या उदाहरणांवरून स्पष्ट केले आहे. आपण संविधान वापरून आपल्या आयुष्यातील समस्या सोडवू शकतो, हा विश्वास सर्वसामान्यांना वाटण्याचे कारण, हे संविधान आपले आहे, अशी भावना प्रत्येकाच्या मनात रुजवण्यामध्ये राजकीय-सामाजिक धुरिण अल्पावधीतच यशस्वी ठरले. भारत हा काही स्वतंत्र झालेल्या देशांपैकी असा एकमेव देश नाही, ज्याने ब्रिटिश अंमल संपल्यानंतर स्वतंत्र देशाचे संविधान बनविले. पण महत्त्वाचा फरक हा आहे की- केनिया, मलेशिया, घाना, श्रीलंका, पाकिस्तान या देशांचे संविधान ब्रिटिश अधिकाऱ्यांनी व्हाईट हॉल इथे लिहिले. श्रीलंकेचे संविधान तर आयव्हर जेनिंग या जगद्विख्यात संविधानतज्ज्ञाच्या मार्गदर्शनाखाली लिहिले गेले, पण ते फक्त सात वर्षे टिकले. त्यानंतर श्रीलंकेतील लोकांनी ते संविधान आमच्या सामाजिक गरजांनुसार लिहिले गेले नसल्यामुळे निरुपयोगी आहे, अशी टीका करून अव्हेरले होते. याच आयव्हर जेनिंग यांना १९५१ मध्ये मद्रास विद्यापीठात भारतीय संविधानावर व्याख्यानासाठी बोलावले होते, त्या वेळी भारतीय संविधान खूप जास्त लांबीचे आणि जटिल पद्धतीने




लिहिले, अशी टीका त्यांनी केली होती. श्रीलंकन उदाहरणावरून हे लक्षात येते की, केवळ संविधानतज्ज्ञाने ते लिहून सर्वसमावेशक वा उपयुक्त होत नाही.

ग्रेनव्हिल ऑस्टिन यांनी 'वर्किंग ऑफ डेमोक्रॅटिक कॉन्स्टिट्युशन अ हिस्टरी ऑफ इंडियन एक्सपीरिअन्स' या ग्रंथात भारतीय संविधानाचा प्रवास अनोख्या पद्धतीने शब्दबद्ध केला आहे. २६ जानेवारी १९५० या दिवसापासून या पुस्तकाची सुरुवात होते आणि १९८० सालापर्यंतचा प्रवास शब्दबद्ध करते. एखाद्याने आपल्या व्यक्तिगत डायरीत संविधानाच्या बाबतीत रोज काय घडले, याची काळजीपूर्वक नोंद ठेवावी अशा स्वरूपात हे पुस्तक लिहिले आहे. याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे- भारतीय संविधानाविषयी अतिशय अधिकृत समजले जाणारे हे पुस्तक लिहिणारे ग्रेनव्हिल ऑस्टिन काही लौकिक अर्थाने वकील वा कायदेतज्ज्ञ नाहीत. ते मूळचे इतिहासकार आहेत. भारतीय संविधानाचा इतिहास लिहावा, या मर्यादित उद्देशाने त्यांनी ते पुस्तक लिहिले. पण त्यांचे भारतीय संविधानाचे आणि भारतीय समाजमनाचे आकलन इतके मूलगामी आहे की, इतिहासाचा दस्तऐवज संविधानाच्या

आकलनाचे महत्त्वाचे साधन बनला! बहुशाखीय संशोधनाचा आजच्या काळात खूप बोलबाला होत असला तरी, ज्या काळात ही संकल्पना फारशी चर्चिली जात नव्हती, त्या काळी बहुशाखीय संशोधन हे किती वाचनीय, अधिकृत आणि उपयुक्त असू शकते, याचा जणू वस्तुपाठच हे लिखाण आपल्याला देते. दि.२५ जून १९७५ या दिवशी पुकारलेल्या आणि पुढे जवळपास २१ महिने अस्तित्वात राहिलेल्या आणीबाणीनंतरच्या निवडणुकीत काँग्रेसचा दारुण पराभव झाला, त्यावर भाष्य करताना ग्रेनव्हिल ऑस्टिन यांनी लिहिले– 'भारतीय लोक बहुसंख्येने निरक्षर असल्यामुळे त्यांना लोकशाही शासनप्रणाली योग्यरीत्या वापरता येईल की नाही अशी शंका पाश्चात्त्य राज्यशास्त्रज्ञांनी उपस्थित केले होती. त्या सर्वांना भारतीय नागरिकांनी आपल्या अंगभूत शहाणपणाच्या जोरावर राजकीय शहाणपण दाखविले. आणि ते सगळे तज्ज्ञ किती अयोग्य विचार करत होते, हे दाखवून दिले.'

'संविधान कशासाठी?' याचा विचार करता, राजकीय व्यवस्थेला संरचना प्रदान करण्यासाठी संविधान आवश्यक ठरते. 'संविधान कुणासाठी?' या प्रश्नाचा धांडोळा घेता, जे सर्वसामान्य लोक या प्रजासत्ताकाचा गाभा आहेत, त्यांच्या हितरक्षणासाठी ते आवश्यक ठरते असे उत्तर मिळते. न्यायाधीश लर्नेड हँड यांच्या शब्दांत सांगायचे तर... संविधान ही राजसत्तेने दिलेली स्वातंत्र्याची सनद नाही, तर स्वातंत्र्याने राजसत्तेला दिलेली सनद आहे. ही शहाणीव प्रत्येक नागरिकाच्या ठायी यावी यासाठी संविधान प्रत्येकासाठी आणि प्रजासत्ताकातील सर्व घटकांसाठी आवश्यक ठरते!

**प्रा. डॉ. प्रतापसिंह भीमसेन साळुंके**
Mob. 9960887411
1982prataps@gmail.com
मराठवाडा मित्र मंडळाचे शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालय, पुणे

जवळपास तीन वर्षे चाललेली संविधान लिहिण्याची प्रक्रिया दि.२६ नोव्हेंबर १९४९ रोजी पूर्ण झाली आणि भारताच्या सर्व नागरिकांनी ते स्वत:लाच अर्पण केले. दि.२६ जानेवारी १९५० पासून संविधानानुसार प्रत्यक्ष कारभाराला सुरुवात झाली. अनेक शतकांची सरंजामी व्यवस्था अन् ब्रिटिशांची दीडशे वर्षांची वसाहती व्यवस्था संपुष्टात येऊन प्रजासत्ताक व्यवस्थेची सुरुवात झाली. हा बदल वाटतो तितका सहज–सोपा नव्हता. पण देशाने मोठ्या आशेने आणि हिमतीने तो स्वीकारला. सर्वसामान्य नागरिकांसाठी हे सारे नवे होते. कुणी राजा वा नवाबासमोर मुजऱ्यासाठी झुकून शतकानुशतके कशाची तरी याचना करणारी सर्वसामान्य माणसे स्वतःचा प्रतिनिधी ठरवू शकणार होती. हे सारे क्रांतिकारकच होते! डॉ.बाबासाहेब आंबेडकर या बदलाविषयी संविधान सभेत म्हणाले– 'यापुढे कुणाला राजा होण्यासाठी राणीच्या पोटी जन्म घ्यावा लागणार नाही, इथून पुढे राजाचा जन्म मतपेटीतूनच होईल.'

कायदे मंडळ, प्रशासन आणि न्यायव्यवस्था यांच्या कार्यक्षेत्रात काय येईल आणि काय येणार नाही, याची तरतूद संविधानात करण्यात आली. पण संविधानानुसार राज्याचे हे तीन स्तंभ काम करत आहेत की नाही, हे पाहण्यासाठी सांविधानिक जबाबदारी न्यायालयावर टाकण्यात आली. गेल्या सत्तर वर्षांत न्यायालयाने ही जबाबदारी मोठ्या निष्ठेने पार पाडली. पण मनात एक विचार येतो की– या न्यायदेवतेने जर डायरी लिहिली असती, तर त्यात काय लिहिले असते? या सत्तर वर्षांच्या पटाचे प्रतिबिंब कसे दिले असते? या सत्तर वर्षांच्या प्रवासातील रोमांचित करणारे, समाधान वाटायला लावणारे, अपेक्षाभंगाचे, दुःखाचे, शल्याचे, संभ्रमाचे क्षण कोणते असतील?

न्यायदेवतेने या न लिहिलेल्या डायरीत सत्तर वर्षांचा इतिहास सामावला आहे, अशी कल्पना करून हे सदर पुढील वर्षभर महिन्यातून दोनदा याप्रमाणे प्रसिद्ध होईल. संविधान आणि न्यायसाक्षरता हा या सदरलेखनाचा मुख्य उद्देश आहे. न्याययंत्रणा, न्यायदान, महत्त्वाचे खटले, समकालीन खटले, महत्त्वाच्या घटनादुरुस्त्या, महत्त्वाच्या कायद्यातील दुरुस्त्या, प्रस्तावित कायदे, प्रस्तावित दुरुस्त्या, संविधानातील महत्त्वाची तत्त्वे, मूलभूत स्वातंत्र्य, धर्म, कला, संस्कृती, परंपरा यांच्यावर न्यायदानाचा होणारा परिणाम, व्यक्ती व राष्ट्र यांच्या परस्परसंबंधांतून तयार होणारे ताणेबाणे, न्यायदानाची सामाजिक बाजू, सांविधानिक संस्कृतीची जडण–घडण असा या सदरलेखनाचा परिघ असेल. प्रजासत्ताक राष्ट्रातील नागरिकांनी न्यायदान प्रक्रियेविषयी साक्षर अन् सजग व्हावे, यासाठी हा एक छोटासा प्रयत्न!

**चिनी महासत्तेचा उदय : २**

सतीश बागल



# कॉमिसार डेंग

भारत व चीन हे दोन्ही देश आर्थिक विकासाच्या दृष्टिकोनातून १९७८ पर्यंत समान मागासलेले होते. मात्र आज ४० वर्षांनंतर निर्यात व्यापार, औद्योगिकीकरण, पायाभूत सुविधा, कारखानदारी, विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन व उद्यमशीलता या सर्व बाबतींत चीनने मोठी आघाडी घेतली आहे. चीनचे राष्ट्रीय उत्पादन भारताच्या पाचपट असून, जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये अमेरिकेखालोखाल दोन नंबरची मोठी अर्थव्यवस्था म्हणून चीनचा लौकिक आहे. या आधुनिक चिनी महासत्तेचे जनकत्व बऱ्याच अंशी डेंग झिओपेंग यांच्याकडे जाते. डेंग झिओपेंग यांनी हे सारे कसे साध्य केले, याबद्दलचे फार मोठे कुतूहल जगभर आहे. अनेक पाश्चात्त्य अभ्यासकांनी अलीकडे डेंग यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, त्यांच्या ध्येय-धोरणांचा वेध घेण्याचा आणि त्यांच्या कर्तृत्वाचा आलेख काढण्याचा प्रयत्न केला आहे.

जेमतेम ४ फूट ११ इंच उंची असणारे डेंग झिओपेंग शारीरिक दृष्ट्या छोटेखानीच! मात्र प्रत्येक गोष्ट समजून-उमजून व काळजीपूर्वक बोलणारे डेंग हे एक अतिशय भारदस्त व्यक्तिमत्त्व होते. एखाद्या बैठकीत व समुदायात ते आपले महत्त्वाचे स्थान चटकन निर्माण करीत. त्यामुळे कोठेही गेले की, लोक त्यांच्याकडे काळजीपूर्वक लक्ष देत. बोलताना ते सरळ समोरच्या व्यक्तीच्या डोळ्यांत पाहून बोलत असत. आयुष्यात तरुणपणापासून विविध प्रकारचे (युद्धापासून ते परराष्ट्रधोरण ठरविण्यापर्यंतचे) अनुभव घेतलेले डेंग हे कोणत्याही बाबतीत सरळ मुद्द्यावर येत. ते अतिशय प्रॅक्टिकल होते. उगीचच सैद्धांतिक बाबतीत गुरफटून राहत नसत. कार्यक्षमता, उत्स्फूर्तपणा, काटेकोर विचार या साऱ्यांचा संगम त्यांच्यात होता. सहकाऱ्यांकडून झालेल्या चुकांबाबत ते फारसे ताणून धरत नसत. हाती असलेला प्रश्न व त्याची सोडवणूक त्यांना महत्त्वाची वाटे. क्रांतिकाळात, युद्धाच्या ऐन धकाधकीच्या काळात तसेच भूमिगत चळवळीमध्ये काम केले असल्याने डेंग हे कधी लिहिण्याच्या फंदात फारसे पडले नाहीत. या वैशिष्ट्यपूर्ण पार्श्वभूमीमुळे असेल, पण त्यांची स्मरणशक्ती तीव्र होती. एक तासापर्यंतचे पूर्ण भाषण ते संथ लयीमध्ये, मुद्देसूदपणे,

रशियामधील एक वर्षाच्या सैद्धांतिक शिक्षणाने डेंग यांची कम्युनिस्ट विचारांची बैठक पक्की झाली. मार्क्स-एंगल्स-लेनिन यांचे विचार, हिस्टॉरिकल मटिरिॲलिझम, कम्युनिस्ट पक्षाचा इतिहास, चीनमधील क्रांतीचा इतिहास इत्यादी अनेक विषयांचा त्यांनी अभ्यास केला. त्यांना आणखी एक महत्त्वाची बाब रशियात पाहावयास मिळाली. रशियन अर्थव्यवस्थेत त्या वेळी न्यू इकॉनॉमिक पॉलिसी धोरणांतर्गत छोटे शेतकरी, दुकानदार, व्यापारी व मोठे उद्योग यांना बाजारप्रणित अर्थव्यवस्थेप्रमाणे अर्थार्जन करण्यास मर्यादित स्वातंत्र्य दिलेले होते. कम्युनिझमच्या आधिपत्याखाली मर्यादित बाजारप्रणित अर्थव्यवस्था कार्यक्षमतेने काम करू शकते, हे त्यांचे त्या वेळचे निरीक्षण महत्त्वाचे होते. त्यांनी १९७८ मध्ये हाती सत्ता आल्यानंतर त्याच धर्तीवर अर्थव्यवस्था खुली करून तिला मर्यादित बाजारप्रणित व्यवस्थेकडे नेले आणि चीनच्या आर्थिक विकासाचा पाया रचला.

कोणतेही टिपण जवळ न घेता देऊ शकत.

डेंग हे कम्युनिस्ट विचारसरणीतले असले तरी, लहानपणी ते चिनी परंपरेत वाढले असल्याने कन्फ्युशियन पारंपरिक संस्कृतीचा खोल ठसा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर होता. त्यामुळे ते व्यवहारीही होते. आंतरराष्ट्रीय व्यवहारात व चर्चेत ते चीनच्या हितसंबंधांबाबत स्पष्टपणे बोलत. मात्र हे सारे व्यवहाराला धरून असल्याने परदेशातील अनेक राजकीय नेते, मुत्सदी व राष्ट्रप्रमुख यांच्याशी त्यांचे व्यक्तिगत पातळीवर उत्तम संबंध राहिले. ते उत्तम ब्रिज खेळत असत. उजव्या कानाने ते बऱ्यापैकी अधू होते. सिचुआन प्रांतातील चिनी भाषेतील वैशिष्ट्यपूर्ण 'सिचुआन' ढंगात ते बोलत असत. कम्युनिस्ट पक्ष व चीनवर त्यांचे अतोनात प्रेम होते.

डेंग यांची राहणी साधी होती. लहान वयापासून चळवळीत ओढले गेल्यामुळे त्यांचे औपचारिक शिक्षण फारच कमी झाले होते. उच्च शिक्षणाच्या संधीपासून वंचित राहिलेल्या डेंग यांना उच्च शिक्षण, संशोधन व विद्यापीठे यांच्याबद्दल विशेष आस्था होती. विशेषत: विज्ञान व तंत्रज्ञान याबाबत त्यांना प्रेम होते. त्यांची पत्नी विद्यापीठात पदार्थविज्ञानाची प्राध्यापक होती. पुढे सत्ता हाती आल्यानंतर त्यांनी शैक्षणिक सुधारणा व विद्यापीठात गुणवत्तेची जोपासना करण्यासाठी अग्रक्रम दिला. ते चिनी लष्कराशी आयुष्यभर संबंधित राहिले. पीपल्स लिबरेशन आर्मीचे ते कॉमिसार होते. म्हणजे कोणताही प्रदेश लष्कराने जिंकून घेतला की, लष्कराच्या साह्याने त्या प्रदेशाचे नागरी प्रशासन चालविणे, हे त्यांचे प्रमुख काम असे. याबद्दलचा त्यांचा अनुभव मोठा असल्याने पुढे ते सेन्ट्रल मिलिटरी कमिशन (सीएमसी) चे सदस्य व नंतर १९७८ पासून शेवटपर्यंत (१९९३) अध्यक्ष राहिले.

राजकीय सहमती निर्माण करून निर्णय घेणे, पुढे जाणे हे त्यांचे वैशिष्ट्य. त्यामुळे आर्थिक उदारीकरण व आर्थिक सुधारणा याबद्दल महत्त्वाची धोरणे त्यांनी अतिशय कुशलतेने आपल्या सहकाऱ्यांकडून मान्य करून घेतली. मात्र यावरून ते उदारमतवादी व लोकशाही विचारांचे होते, असा निष्कर्ष काढणे चुकीचे होईल. किंबहुना, माओंच्या १९५८ ते १९६२ दरम्यानच्या 'ग्रेट लीप फॉरवर्ड' या कार्यक्रमात व पुढेही ते अनेकदा कठोरपणे वागले. केवळ माओंच्या सांगण्यावरून त्यांनी चीनमधील लाखो बुद्धिमंत आणि विचारवंतांना तुरुंगात डांबले, अनेकांना देशोधडीस लावले. त्यांनी १९७८ ते १९९३ पर्यंतच्या काळात अर्थव्यवस्था खुली केली व आर्थिक सुधारणा केल्या, हे खरे; मात्र त्याच वेळी त्यांनी कोणत्याही राजकीय सुधारणा करण्याचे नाकारले. बुद्धिमंत व विचारवंत यांचा उपयोग राष्ट्रबांधणीत करून घ्यायचा; मात्र त्यांना मर्यादित स्वातंत्र्य द्यायचे, प्रसंगी त्यांना कठोरपणे वागवायचे- ही त्यांची पद्धत होती. म्हणूनच चीनमधील बुद्धिमंत व विचारवंत, डेंग हे हुकूमशाही प्रवृत्तीचे आहेत, असे शेवटपर्यंत म्हणत. त्यांचा क्रांतीतील आणि युद्धातील सहभाग, साहसी जीवन, त्यांच्या आयुष्यात आलेले अनेक चढ-उतार, त्यांची भटकंती यामुळे त्यांचे चरित्र ढंगदार झाले, हे खरे! मात्र, या साऱ्यांचा त्यांच्या राजकीय वाटचालीवर आणि पुढील आयुष्यातील राजकीय व आर्थिक धोरण आखणीवर परिणाम झाला असल्याने त्यांचे चरित्रविषयक तपशील समजावून घेणे महत्त्वाचे आहे.

डेंग झिओपिंग यांचा जन्म १९०४ मध्ये चीनमधील सिचुआन प्रांतातील ग्वांगान जिल्ह्यात पैफांग या गावात एका छोट्या जमीनदार कुटुंबात झाला. लहानपणापासून अतिशय बुद्धिमान व तरतरीत असलेले डेंग हे पुढे एखाद्या चांगल्या सरकारी नोकरीत जातील, असे त्यांच्या कुटुंबीयांना वाटत होते. चीनमध्ये १९११ मध्ये झालेल्या राष्ट्रवादी उठावात, मोडकळीस आलेले चिंग (मांचू) घराण्याचे साम्राज्य संपुष्टात आले आणि त्याजागी सन येत सेन व त्यांच्या सहकाऱ्यांच्या क्रांती मोर्चाने चिनी प्रजासत्ताक स्थापन केले. पूर्वीच्या काळी नागरी सेवांसाठीच्या स्पर्धात्मक परीक्षांसाठी उमेदवारांना कन्फ्युशियन पद्धतीचे शिक्षण घ्यावे लागे. यामध्ये विविध प्रकारची पाठांतरे, चीनमधील परंपरांचा व इतिहासाचा अभ्यास, चिनी नीतिशास्त्र व जुन्या चिनी भाषेचा अभ्यास इत्यादींचा समावेश असे. क्रांती मोर्चाचे प्रजासत्ताक अस्तित्वात येत असले, तरी नवी शाळापद्धती अजून सुरू व्हायची होती. त्यामुळे डेंग यांना पाचव्या वर्षापासून कन्फ्युशियन पद्धतीच्या शिक्षणक्रमासाठी पैफँग येथेच एका जवळच्या नातेवाईकाच्या घरी ठेवण्यात आले. याच वर्षी १९१९ मध्ये डेंग यांना वयाच्या १५ व्या वर्षी राजकीय चळवळीत भाग घेण्याची संधी मिळाली. पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर फ्रान्स येथे झालेल्या व्हर्सायच्या तहामध्ये पाश्चिमात्य राजकीय नेत्यांनी जर्मन आधिपत्याखालील उत्तर-पूर्व चीनमधील Shandong प्रांताचा पूर्व भाग हा चीनकडे सुपूर्द न करता जपानकडे

देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे बीजिंग विद्यापीठ व नानजिंग विद्यापीठ येथील संतप्त झालेल्या विद्यार्थ्यांनी ४ मे १९१९ रोजी पाश्चिमात्य देशांच्या व चिनी सरकारच्या विरोधात जोरदार निदर्शने केली. ही बातमी चीनमधील इतर विद्यापीठांत व शैक्षणिक संस्थांमध्ये वणव्यासारखी झपाट्याने पसरली. ग्वांगान हे देशातील मोठ्या शहरांशी व्यवस्थित जोडले असल्याने तेथेही विद्यार्थ्यांनी निदर्शने केली. ही निदर्शने डेंग यांच्या भावी राजकीय वाटचालीसाठी महत्त्वाची होती. कारण या निदर्शनांमुळेच अगदी तरुण वयात आपल्या देशावर इतर राष्ट्रांनी केलेल्या अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा त्यांच्यात निर्माण झाली.

मांचू साम्राज्याचा अंत झालेला असल्याने व तरुणांसाठी सरकारी नोकऱ्यांची दारे बंद झाली असल्याने त्यांचे वडील डेंग वेनमिंग हे तरुण डेंग झिओपेंगसाठी इतरत्र काही संधी मिळते का याचा शोध घेत होते. अशीच एक संधी म्हणजे, फ्रान्समध्ये चिनी कामगार तरुणांसाठीची 'कमवा आणि शिका' ही योजना. पहिल्या महायुद्धात अनेक फ्रेंच तरुण युद्धावर गेले असल्याने फ्रान्समध्ये चीनमधील तरुणांना वाव होता. या योजनेनुसार चिनी तरुण फ्रान्सला शिकण्यासाठी दर वर्षी जात. हे विद्यार्थी तेथे काम करीत, थोडी फार कमाई करीत व फावल्या वेळात विद्यापीठात शिक्षण घेत असत. सिचुआन प्रांतातील फ्रान्समध्ये शिक्षण घेतलेल्या एका श्रीमंत व्यापाऱ्याने फ्रान्समध्ये एक शिष्यवृत्ती योजना सुरू केली होती. या शिष्यवृत्तीसाठीची परीक्षा डेंग झिओपेंग यांनी चोकिंग येथे दिली. अशा रीतीने १६ वर्षांचा तरुण डेंग झिओपेंग १९२० मध्ये इतर ८४ विद्यार्थ्यांसह फ्रान्सला रवाना झाला. शांघायमध्ये एका आठवड्याच्या मुक्कामात स्वत:च्याच देशात पाश्चिमात्य गोऱ्या व जपानी लोकांकडून स्थानिक कष्टाळू चिनी लोकांना किती वाईट वागविले जात होते, हेही त्याने पाहिले. पुढे शांघायहून हाँगकाँग, व्हिएतनाम, सिंगापूर, कोलंबो या मार्गाने डेंग शेवटी फ्रान्समध्ये मार्सेल्स येथे येऊन पोहोचले. दरम्यान साऱ्याल बंदरांमध्ये चिनी व आशियाई कामगारांना कसे वागविले जात होते, हे पाहणे हा त्यांच्यासाठी नुसताच एक दुख:द



माओ व डेंग

अनुभव नव्हता; पुढे आयुष्यभर गरिबी व अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा देणाऱ्या या घटना होत्या.

चीन व फ्रान्स यांच्या सहकार्याने १९१९ ते १९२१ या दरम्यान एकूण १६०० चिनी विद्यार्थी फ्रान्समध्ये आले. मात्र महायुद्ध संपल्यानंतर युरोपियन देशांची अर्थव्यवस्था तणावाखाली आली होती आणि युद्धावर गेलेले कामगारही परत आले. त्यामुळे तिथे नोकऱ्या कमी झाल्या. शिवाय सिचुआन प्रांतातील व्यापाऱ्यांचे फाउंडेशनही– ज्यांच्या शिष्यवृत्तीवर डेंग फ्रान्सला आले– तीन चार महिन्यांत अडचणीत आले. त्यांनी शिष्यवृत्तीची योजनाच बंद केली. काही काळानंतर डेंग यांना पॅरिसजवळील श्नायडर अँड साय या फ्रान्समधील सगळ्यात मोठ्या शस्त्रास्त्र कारखान्यात मजुराची नोकरी कशीबशी मिळाली.

रशियन राज्यक्रांतीला १९२० मध्ये तीन वर्षे होऊन गेली होती. या क्रांतीचे प्रतिध्वनी फ्रान्समधील डाव्या व समाजवादी बुद्धिमंतांमार्फत या तरुण विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत होते. भांडवलशाही, साम्राज्यवाद व वसाहतवाद या संकल्पनांची ओळखही डेंग व त्यांच्या सहकाऱ्यांना होत होती. चीनमध्ये कम्युनिस्ट पक्षाची स्थापना १९२१ मध्ये करण्यात आली. त्यामुळे १९२२ मध्ये फ्रान्समधील अनेक चिनी विद्यार्थ्यांनीही स्थानिक युवक कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली. पुढे ही संघटना (Chinese Communist Youth League in France) चीनच्या कम्युनिस्ट पक्षाला संलग्न करण्यात आली. फेब्रुवारी १९२३ मध्ये डेंग यांनी 'युरोपियन यंग कम्युनिस्ट्स काँग्रेस'मध्ये कम्युनिस्ट पक्षाचा प्रतिनिधी म्हणून भाग घेतला. अशा रीतीने अवघ्या १९ व्या वर्षी चीनच्या कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य म्हणून ते राजकीय चळवळीत ओढले गेले आणि आयुष्यभर कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य म्हणून राहिले. पॅरिसच्या या युथ कम्युनिस्ट लीगचे सचिव म्हणून झाऊ एन लाय यांची नेमणूक झाली होती, ते पुढे चीनचे पंतप्रधान झाले. डेंग यांचे सारे राजकीय शिक्षण झाऊ एन लाय यांच्या देखरेखीखाली झाले. अनेक अर्थाने ते डेंग यांचे गुरू होते.

श्नायडर फॅक्टरीतील कष्टाचे काम सोडून जवळच्या छोट्या गावात बूट तयार करण्याच्या कारखान्यात डेंग नोकरीला लागले. तेही काम सोडून त्यांनी स्थानिक कॉलेजमध्ये शिक्षणासाठी प्रवेश घेतला, परंतु आर्थिक अडचणींमुळे त्यांना शिक्षण सोडावे लागले. मग ते परत पक्षाकडे वळले व पक्षाचेच काम करू लागले. त्याचबरोबर त्यांनी पॅरिसमधील 'युरोपियन कम्युनिस्ट ऑर्गनायझेशन'चे काम करणे सुरू केले. झाऊ एन लाय यांच्या हाताखाली काम करताना ते 'रेड लाईट' या नावाचे एक दहापानी मासिक चालवीत. डेंग यांचे अक्षर सुंदर असल्याने या मासिकाचे लिखाण, स्टेन्सिल कट करणे, संपादन करणे इत्यादी सर्व कामे त्यांच्याकडे दिली जात. झाऊ एन लाय हे डेंगपेक्षा सहा वर्षांनी मोठे होते. शिवाय, फ्रान्समध्ये त्यांचे शिक्षण झालेले असल्याने फ्रान्समधील इतर कम्युनिस्ट नेत्यांशी संपर्क ठेवणे, पक्षाची व चळवळीची स्ट्रॅटेजी ठरविणे, इतर पक्षांचे व नेत्यांचे सहकार्य मिळविणे– ही सारी कामे ते स्वत: करीत. त्यांच्या हाताखाली काम करताना डेंग यांना बरेच काही शिकावयास मिळाले. फ्रान्समधील ही पाच वर्षे डेंग यांच्या भावी राजकीय कारकिर्दीच्या दृष्टीने महत्त्वाची ठरली. सैद्धांतिक मार्क्सवादाचा अभ्यास, प्रत्यक्ष चळवळ उभारणे, क्रांतीसाठी संघटन करणे, यामुळे तरुण वयातच मोठ्या जबाबदाऱ्या पेलण्याची क्षमता त्यांच्यात विकसित झाली. फ्रान्समधील ल्यॉन प्रांतातील मुख्य संघटक म्हणून त्यांची १९२५ मध्ये नेमणूक झाली. अनेक चळवळी व निदर्शने यात भाग घेतल्याने ते उत्तम भाषण देत. याशिवाय पाश्चिमात्य विचार, त्या विचारांतील खुलेपणा, भांडवलशाहीतील विविध प्रेरणा यांचीही ओळख त्यांना येथे झाली. जगभरातील कम्युनिस्ट पक्षांची व त्यांच्या देशातील वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय वातावरणात होत असलेली वाटचाल आणि त्यातील वैविध्य या साऱ्यांची जाण व समज डेंग यांना या काळात येत होती. झाऊ एन लाय, डेंग व कम्युनिस्ट पक्षातील फ्रान्स/ युरोपमध्ये राहिलेले इतर सारे नेते राजकीय विचाराबाबत आणि प्रत्यक्ष राजकारणाबाबत बरेच वास्तववादी व Pragmatic होते. त्या काळात फ्रान्समध्ये राहिलेल्या व कम्युनिस्ट चळवळीत वाढलेल्या इतर अनेक चिनी नेत्यांनी पुढे चीनमध्ये उत्तम काम केले. डेंग यांनी १९७८ मध्ये सत्ता हाती आल्यानंतर वास्तववादी भूमिका घेऊन अर्थव्यवस्था खुली केली आणि भांडवलशाहीतील अनेक संकल्पना आत्मसात केल्या. त्या साऱ्यांच्या मागे फ्रान्समधील त्यांचे वास्तव्य व अनुभव महत्त्वाचा होता.

कम्युनिस्ट चळवळीतील सहभागामुळे फ्रेंच पोलीस खात्यांची वक्रदृष्टी डेंग यांच्याकडे वळली आणि त्यांना केव्हाही अटक होईल, अशी परिस्थिती निर्माण झाली. दि.७ जानेवारी १९२६ रोजी पोलिसांचा ससेमिरा चुकवून डेंग

रेल्वेने जर्मनीमार्गे रशियाकडे रवाना झाले. तेथे ते मॉस्कोमधील सन येत सेन विद्यापीठात कम्युनिस्ट पक्षाच्या शिक्षणासाठी दाखल झाले. विद्यापीठातील ३०० विद्यार्थ्यांचे एकूण १३ ग्रुप्स करण्यात आले. त्यापैकी थिअरी ग्रुपचे ते प्रमुख झाले. या ग्रुपमधील सदस्यांना पुढे मोठ्या राजकीय जबाबदाऱ्या देण्यात येत. एकंदरीत सन येत सेन विद्यापीठातही डेंग यांनी त्यांची छाप पाडली. ते पुढे चीनमध्ये महत्त्वाच्या राजकीय पदावर जातील, असेच सर्वांना वाटत होते. मॉस्कोमधील सन येत सन विद्यापीठात डेंग यांचा अभ्यासक्रम दोन वर्षांचा होता.

दरम्यानच्या काळात १९१९ मध्ये चीनमध्ये सन येत सेन यांनी कुओमिंगटांग या पक्षाची स्थापना केली होती. मांचू साम्राज्य १९११ मध्ये कोसळल्यानंतर प्रचंड गोंधळ निर्माण झाला होता. त्याची जागा घेणारे प्रजासात्तकही एकसंध नव्हते. स्थानिक सरदार व लष्करी अधिकारी (वॉर लॉर्ड्स) हेच अनेक ठिकाणी सत्ता राबवीत. त्यांच्यावर नियंत्रण नसल्याने केंद्र सरकार व प्रजासत्ताक दुबळे होते. चीनमध्ये रशियाच्या आशीर्वादाने कम्युनिस्ट पक्षाची स्थापना १९२१ मध्ये झाली आणि त्यांनीही राजकीय सत्ता हस्तगत करण्यासाठी चळवळ सुरू केली. सन येत सेन यांचे निधन १९२५ मध्ये झाले आणि चँग कै शेक हे कुओमिंगटांग नेते झाले. सुरुवातीला कुओमिंगटांगच्या छत्राखाली चँग कै शेक यांचा उजवा पक्ष कम्युनिस्ट पक्ष हे चिनी प्रजासत्ताकवर नियंत्रण आणण्यासाठी स्थानिक सेनानी व वॉर लॉर्ड्सबरोबर संयुक्तपणे लढत होते. आता या आघाडीतून बाहेर पडावे, असा निर्णय कम्युनिस्ट पक्षाने १९२७ मध्ये घेतला. अशी व्यूहरचना करण्यास मदत व्हावी म्हणून कॉमिंटर्नने सन येत सेन विद्यापीठातील डेंग व त्यांच्या वीस तरुण साथीदारांना तातडीने चीनमध्ये पाठविण्याचा निर्णय घेतला. अशा रीतीने एप्रिल १९२७ मध्ये आपले शिक्षण अर्धवट सोडून चीनमध्ये परतले.

रशियामधील एक वर्षाच्या सैद्धांतिक शिक्षणाने डेंग यांची कम्युनिस्ट विचारांची बैठक पक्की झाली. मार्क्स-एंगल्स-लेनिन यांचे विचार, हिस्टॉरिकल मटिरिऑलिझम, कम्युनिस्ट पक्षाचा इतिहास, चीनमधील क्रांतीचा इतिहास इत्यादी अनेक विषयांचा त्यांनी अभ्यास केला. त्यांना आणखी एक महत्त्वाची बाब रशियात पाहावयास मिळाली. रशियन अर्थव्यवस्थेत त्या वेळी न्यू इकॉनॉमिक पॉलिसी धोरणांतर्गत छोटे शेतकरी, दुकानदार, व्यापारी व काही मोठे



सन येत सेन

उद्योग यांना बाजारप्रणित अर्थव्यवस्थेप्रमाणे अर्थार्जन करण्यास मर्यादित स्वातंत्र्य दिलेले होते. कम्युनिझमच्या आधिपत्याखाली मर्यादित बाजारप्रणित अर्थव्यवस्था कार्यक्षमतेने काम करू शकते, हे डेंग यांचे त्या वेळचे निरीक्षण महत्त्वाचे होते. त्यांनी १९७८ मध्ये हाती सत्ता आल्यानंतर त्याच धर्तीवर अर्थव्यवस्था खुली करून तिला हळूहळू मर्यादित बाजारप्रणित व्यवस्थेकडे नेले आणि चीनच्या आर्थिक विकासाचा पाया रचला.

रशियामधील एक वर्षाच्या वास्तव्यानंतर जानेवारी १९२७ मध्ये डेंग चीनला रवाना झाले, ते सरळ शांझी प्रांतातील यलो रिव्हर खोऱ्यातील स्थानिक सैन्यदलाचे स्वतंत्र सरदार (वॉर लॉर्ड) फेंग युक्सिअँग यांना त्यांच्या आमंत्रणावरून भेटले. कुओमिंगटांग व कम्युनिस्ट पक्ष यांच्यातील वाढती दरी पाहता, डेंग व त्यांच्या पक्षाच्या सहकाऱ्यांच्या मदतीने आपल्या सैन्यदलातील अधिकारी व जवान यांना युद्धाची/लढ्याची उद्दिष्टे समजावून देऊन त्यांना उत्तमरीत्या लढण्यास प्रोत्साहित करता येईल का हे पाहणे, हा भेटीचा उद्देश होता. मात्र कम्युनिस्ट पक्षाचा कमकुवतपणा, बेताची तयारी व अपुरी युद्धसामग्री पाहता,

फेंग युक्सिअँग यांनी कुओमिंगटांगशी जुळते घेण्याचा विचार केला. त्यांनी डेंग व त्याच्या साथीदारांना परत पाठवून दिले. पक्षाच्या आदेशाप्रमाणे डेंग शांघायला आले आणि तिथे कम्युनिस्ट पक्षाच्या भूमिगत चळवळीत दाखल झाले. कुओमिंगटांग व कम्युनिस्ट यांची आघाडी तुटल्यानंतर कुओमिंगटांगकडून अनेक ठिकाणी कम्युनिस्ट नेत्यांची सरसकट हत्या करण्यात आली. त्यामुळे अनेक कम्युनिस्ट नेते भूमिगत झाले. भूमिगत चळवळीत काम करताना डेंग यांच्या कार्यपद्धतीत कमालीचा फरक झाला. मागे कोठेही पुरावा ठेवायचा नाही, अगदी कागदाचा कपटाही नाही; त्यामुळे सारे तपशील ते थेट डोक्यात ठेवीत.

मॉस्कोमध्ये सन येत सन विद्यापीठात शिकत असताना डेंग यांच्याबरोबर झँग झियुआन ही तरुण सहाध्यायी होती. तिच्याशी त्यांचे स्नेहबंध जुळले होते. चीनमध्ये परतल्यानंतर त्यांची तिच्याशी परत एकदा वुहान येथे पक्षकार्याच्या निमित्ताने भेट झाली व त्यांनी लग्न करायचे ठरविले. लग्नानंतर डेंग पती-पत्नी शांघायला आले.

दि.७ ऑगस्ट १९२७ रोजी वुहान येथे २१ वरिष्ठ कम्युनिस्ट पक्षनेत्यांची महत्त्वाची बैठक झाली आणि त्या बैठकीची इतिवृत्ते व टिपणे घेण्याचे काम डेंग यांच्याकडे देण्यात आले. याच बैठकीत शांत, गंभीर व छोटेखानी डेंग यांची पहिलीच भेट उंच व आकर्षक व्यक्तिमत्त्वाच्या व कमालीचा आत्मविश्वास असलेल्या तरुण माओ झेडुंग यांच्याशी झाली. कम्युनिस्ट पक्षातील अतिशय वरिष्ठ नेत्यांमध्ये अशा रीतीने डेंग यांची उठबस सुरू झाली. त्यांच्या कामामुळे, प्रामाणिकपणामुळे सर्वांवरच त्यांची छाप पडली. पक्षाने १९२९ मध्ये त्यांना शांघायहून ग्वांझी प्रांताच्या पश्चिमेकडील ग्वान्क्षी या मागासलेल्या प्रांतात प्रतिनिधी म्हणून पाठविले. गुओमिंगडाँगबरोबर कम्युनिस्ट पक्षाची असणारी भागीदारी संपुष्टात आल्यानंतर चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या केंद्रीय समितीने कॉमिंटर्नच्या निर्देशानुसार छोट्या-छोट्या शहरांमध्ये/शहरी भागांमध्ये कम्युनिस्ट नेत्यांना पाठवून विविध प्रकारे क्रांतिकारी उठाव करण्याचे निश्चित केले. या धोरणाचा भाग म्हणून डेंग यांना ग्वांझी येथे पाठविण्यात आले. तेथे चँग कै शेक यांच्या कुओमिंगटांगमधून बाहेर पडलेले स्थानिक सरदार व लढाऊ टोळ्या यांच्याबरोबर तात्पुरती राजकीय आघाडी करण्यात डेंग यांना यश आले. अशा रीतीने त्यांनी Baise आणि Longzhou येथे कम्युनिझमचा झेंडा रोवला. कम्युनिस्ट पक्षाच्या इतिहासात अशा घटनांची नोंद साम्यवादी क्रांती वा क्रांतिकारी उठाव अशी झाली असली, तरी प्रत्यक्षात अनेक ठिकाणी बलशाली नेते मोहिमेवर गेल्याने निर्माण झालेल्या पोकळीत करण्यात आलेल्या या तात्पुरत्या स्थानिक तडजोडी होत्या. मोहिमेवरून नेते परत आले की, कम्युनिस्टांना पळ काढावा लागे. अशा रीतीने ग्वांझीमधील छोट्या स्थानिक नेत्यांबरोबर/मिलिटरी अधिकाऱ्यांबरोबर केलेल्या तडजोडी लवकरच संपुष्टात आल्या. तेथील सैन्यदलाचे बडे स्थानिक नेते चँग कै शेकबरोबर संपूर्ण चीनवर नियंत्रण मिळविण्याच्या मोहिमेचा भाग म्हणून उत्तरेकडे कुओमिंटोंगच्या सेनेबरोबर स्वारीवर गेले होते. ते ग्वांझीला परतताच चित्र पूर्ण पालटले. या मोठ्या नेत्यांकडे अधिक संख्येने सैन्यदल व शस्त्रास्त्रे असल्याने त्यांनी परत येताच दरम्यानच्या काळात झालेल्या व्यवस्था नुसत्याच मोडीत काढल्या नाहीत; तर अशा तडजोडी करून कम्युनिस्ट पक्षाबरोबर हातमिळवणी करणाऱ्या सैन्यदलातील अधिकाऱ्यांना कठोर शासन केले, कम्युनिस्ट नेत्यांची कत्तल केली आणि कम्युनिस्टांच्या सशस्त्र दलांची मोठी हानी केली.

डेंग यांच्या Baise आणि Longzhou येथील सातव्या रेड आर्मीचा नुसताच पराभव झाला नाही, तर त्या सैन्याची मोठी हानी होऊन सैन्याला स्थानिक झुआंग (Zhuang) टोळ्यांच्या मदतीने उत्तरेकडे माघार घ्यावी लागली. अशाच एका माघारीच्या लढाईत सातव्या रेड आर्मीबरोबर असलेले डेंग आपल्या सैन्यदलापासून मागे पडले व त्यांचा सैन्यदलाशी संपर्क पूर्णपणे तुटला. पदरी पराभव व मानहानी आल्याने अत्यंत अपमानास्पद परिस्थितीत ते शांघायला परतले. शांघायला परत आल्यानंतर त्यांनी पक्षाला आत्म-निभर्त्सना (Self-Criticism) सादर करून स्वत:च्या चुकांची कबुली दिली. सातव्या रेड आर्मीनेच आपणास शांघायला परत जाण्यास सांगितले, अशी भूमिका त्यांनी घेतली; तरीही सातव्या रेड आर्मीला सोडून शांघायला परतायला नको होते, याची कबुलीही त्यांनी दिली.

हे प्रकरण येथे मिटले खरे. पण पुढे सांस्कृतिक क्रांतीच्या दरम्यान त्यांच्या विरोधकांनी हे प्रकरण उकरून काढले आणि त्यांना पक्षातील व सरकारमधील महत्त्वाची पदे गमवावी लागून बराच काळ सत्तेबाहेर राहावे लागले.

**डॉ. सतीश बागल**, नाशिक
bagals89@gmail.com

## इफ्फी २०१९ : ४

मीना कर्णिक



# नागडा नायक आणि तिरकस म्हातारे

**'पॅट्रिक' आणि 'द वीझल्स टेल' हे इफ्फीमधले लक्ष वेधून घेणारे दोन सिनेमे होते. खूप उच्च दर्जाचे नसले, तरी खास होते. त्यांच्याविषयी–**

दिग्दर्शक टिम मेलान्ट यांचा 'पॅट्रिक' हा बेल्जियम सिनेमा अर्थातच पॅट्रिकची गोष्ट सांगतो.

पॅट्रिक आपल्या वडिलांच्या नेचरिस्ट कॅम्पसाईटची देखभाल करणारा ३८ वर्षांचा पुरुष. किंचित मंद. शांत. कोणत्याही गोष्टीविषयी पट्कन प्रतिक्रिया न देणारा. आपल्या विश्वात रमणारा. त्याचं विश्व म्हणजे त्याचं वर्कशॉप. तिथे लाकडापासून विविध प्रकारचं फर्निचर तो बनवतो. पण ते शहरात विकावं, त्यातून एखादा नवा व्यवसाय उभा करावा, असा विचारही त्याच्या मनात येत नाही.

आणि मग एक दिवस पॅट्रिकचे वडील आजारी पडतात. त्याच वेळी त्याचा खास हातोडा चोरीला जातो. पॅट्रिक अतिशय अस्वस्थ होतो. आयुष्यात पहिल्यांदाच वडिलांचा मृत्यूही त्याला या चोरीसमोर दुय्यम वाटत असतो. चोर शोधून काढायचा आणि हातोडा परत मिळवायचा, एवढा एकच ध्यास तो घेतो.

हा सिनेमा त्याच्या या ध्यासाचीही गोष्ट आहे. आता यात वेगळेपण काय आहे, असा प्रश्न आपल्या मनात येतो. खरंच, असं काय आगळं आहे या सिनेमात?

पॅट्रिकच्या वडिलांचा नेचरिस्ट कॅम्प आहे. म्हणजे, निसर्गाच्या सान्निध्यात एक कॅम्पसाईट विकत घेऊन त्यांनी छोटी-छोटी कॉटेजेस बांधलेली आहेत. अनेक जोडपी तिथे महिनोन्‌महिने राहतात. काही जोडपी एखाद्या आठवड्यासाठी येतात. यातली बहुतेक वयस्क आहेत. उरलेलं आयुष्य निसर्गाच्या सान्निध्यात घालवायचं म्हणून त्यांनी ही जागा निवडली आहे.

मात्र, या जागेचं आणखी एक वैशिष्ट्य आहे. नेचरिस्ट कॅम्पमध्ये राहणारे सगळे संपूर्ण नग्नावस्थेत वावरत असतात. अर्थात, नग्न राहणं हा इथला नियम नाही, पण जीवनपद्धती आहे. पॅट्रिक आणि त्याचे वडील तसे वावरत असले तरी आई नाही. (ही आई अंध आहे आणि आपल्या भोवती सगळे नग्नावस्थेत वावरताहेत याची तिला

दिग्दर्शक टिम मेलान्ट यांचा हा पहिलाच सिनेमा. लहान असताना आई-वडिलांनी त्यांना एका न्यूडिस्ट कॅम्पला नेलं होतं. एक मुलगा आणि त्याची अंध आई तो कॅम्प चालवत होते. ती आठवण मनाच्या एका कोपऱ्यात कायम राहिली आणि मग त्याची गोष्ट बनली. आपल्या नटांना नग्न वावरायला तयार करणं कठीण होईल, असं मेलान्टना वाटत होतं. पण तसं घडलं नाही. ''आपल्याला कपड्यांशिवाय काम करायचंय म्हणून कोणीही मला नकार दिला नाही,'' एका मुलाखतीत त्यांनी सांगितलंय. ''कारण त्या रहस्यमय वातावरणाचा ही नग्नता एक महत्त्वाचा भाग आहे याची जाणीव त्यांना होती. पण म्हणून हा सिनेमा नग्नतेविषयी नाही, हेही त्यांना समजलं. आम्ही त्याकडे एक कॉस्च्युम ड्रामा म्हणून बघितलं. कपडे न घालणं हीसुद्धा एक वेशभूषाच आहे, असं म्हटल्यानंतर त्यात खटकण्यासारखं काही राहतच नाही.'' आयुष्यात दु:खाला सामोरं जाण्याविषयीचा हा सिनेमा म्हणूनच आगळा ठरतो.

कल्पनाही नाही). बहुतेक जोडप्यांनी मात्र ही जीवनपद्धती अवलंबलेली आहे. त्यामुळे समोर पडद्यावर आपल्याला बहुतेक माणसं नागड्याने फिरताना दिसतात. महत्त्वाचं म्हणजे, त्यांचं नग्न असणं हा मुळी मुद्दाच नाही. निसर्गाच्या कुशीत, नैसर्गिक अवस्थेत जगणं इतकंच त्यांचं म्हणणं आहे.

हे सगळं जरी असलं तरी सिनेमे सुरू झाल्यानंतर सुरुवातीची काही मिनिटं आपण अस्वस्थ होतो. जागतिक सिनेमा पाहण्याची सवय असणाऱ्यांना नग्नता खटकायचं कारण नाही. पण तरीही एकाच वेळी, कोणतंही कारण नसताना अशी नग्न फिरणारी माणसं पाहण्याची आपल्याला सवय नसते. एरवी सिनेमाच्या पडद्यावर नग्नता येते ती काही ठोस कारणासाठी. मग ते कारण सेक्स दाखवणं असो किंवा क्रौर्य दाखवण्यासाठी असो. इथे तसं काहीच नाही. नेचरिस्ट कॅम्पमध्ये राहणारी माणसं- इतकंच त्यांच्या नग्नतेमागचं कारण आहे. त्यामुळे, अंगावर एकही कपडा नसलेली, खुर्चीवर बसून कॉफी पिणारी जोडपी आपल्याला दिसतात. कॅम्पसाईटच्या ऑफिसमध्ये मीटिंगसाठी आलेली माणसं, स्वयंपाक करणारी माणसं, भांडणारी माणसं, एकमेकांना आधार देणारी माणसं, प्रेम करणारी माणसं, काम करणारी माणसं... सगळी नग्न. त्यांची नग्नता सोडली, तर बाकी सगळं नेहमीचं जगणं.

पण होतं असं की, दहा-पंधरा मिनिटांनंतर आपल्याला प्रेक्षक म्हणून ही नग्नता जाणवत राहणं बंद होतं. आपणही त्या जगाला एक नॉर्मल जग म्हणून स्वीकारतो. जंगलात आपलं आयुष्य शांतपणे जगणारे प्राणी पाहताना कुठे कधी ऑकवर्ड व्हायला होतं? तसंच इथेही ती नग्नता आपल्या अंगवळणी पडते किंवा आपण ती त्या निसर्गाचा भाग म्हणून स्वीकारतो आणि पॅट्रिकच्या गोष्टीत रमून जातो. शेवटी आपण जोखायचा तो बाहेरच्या कपड्यांवरून नाही; तर त्याच्या अंतरंगावरून, त्याच्या वागण्यावरून, त्याच्या प्रामाणिकपणावरून.

या सिनेमात विनोद आहे, दु:खही आहे. आपल्या प्रसिद्ध प्रियकराबरोबर वेळ घालवण्यासाठी म्हणून एक तरुण मुलगी कॅम्पमध्ये येते. हा प्रियकरही काही दिवसांपूर्वीच तिथे आलाय. ऑफिसच्या रजिस्टरमध्ये पॅट्रिक तिचं नाव नोंदवून घेतो आणि तिची सूटकेस घेण्यासाठी आपल्या काऊंटरवरून बाहेर येतो, कोणाही मॅनेजरने यावं, तसा. पण त्याला त्या संपूर्ण नग्नावस्थेत बघून त्या मुलीला मात्र धक्का बसतो.

''तुझ्या अंगावर कपडे नाहीयेत!'' ती त्याला म्हणते.

''हो.'' असं उत्तर देत पॅट्रिक तिची बॅग उचलून शांतपणे चालू लागतो. तिचे विस्फारलेले डोळे त्याच्या खिजगणतीतही नसतात.



आणखी एका प्रसंगात, कॅम्पमध्ये आलेला रॉकस्टार अत्यंत गंभीरपणे पॅट्रिकला सल्ला देतो, ''तू एखादी गोष्ट जितकी जास्त शोधतोस तितकी ती सापडण्याची शक्यता कमी होते. मला खूप मोठं व्हायचं होतं, म्हणून मी खूप प्रयत्न केले. पण मला यश मिळालं नाही. मग मी प्रयत्न करणं थांबवलं आणि मला यश मिळालं. तेव्हा तुला जर एखादी गोष्ट मनापासून हवी असेल, तर ती आपल्याला नकोय असं स्वत:ला सांगण्याचा प्रयत्न कर.''

दुसऱ्या बाजूला, आपला हातोडा हरवला म्हणून प्रचंड अस्वस्थ झालेला पॅट्रिक वडिलांच्या मृत्यूने एकट्या पडलेल्या आईचं सांत्वनही करत नाही. किंबहुना, तसा विचारही त्याच्या डोक्यात येत नाही. त्या बाबतीत तो अत्यंत अलिप्तपणे वागतो.

मुळात पॅट्रिकच्या चेहऱ्यावर आपल्याला कोणत्याच भावना फार तीव्रतेने दिसत नाहीत. कॅम्पसाईटवरच्या एका वयस्क जोडप्यामधली बाई जॅमची एक्स्ट्रा बाटली मिळावी म्हणून पॅट्रिकबरोबर सेक्स करायला येते, तेव्हाही तो निर्विकार चेहऱ्याने तिची मागणी पूर्ण करतो. त्यावर ना आनंद दिसतं, ना समाधान. अगदी त्याला पोलीस अटक करतात तेव्हाही त्याचा चेहरा तसाच, कोणत्याही भावना न दाखवणारा.

दिग्दर्शक टिम मेलान्ट यांचा हा पहिलाच सिनेमा. लहान असताना आई-वडिलांनी त्यांना एका न्यूडिस्ट कॅम्पला नेलं होतं. एक मुलगा आणि त्याची अंध आई तो कॅम्प चालवत होते. ती आठवण मनाच्या एका कोपऱ्यात कायम राहिली आणि मग त्याची गोष्ट बनली. आपल्या नटांना नग्न वावरायला तयार करणं कठीण होईल, असं मेलान्टना वाटत होतं. पण तसं घडलं नाही.

''आपल्याला कपड्यांशिवाय काम करायचंय म्हणून कोणीही मला नकार दिला नाही,'' एका मुलाखतीत त्यांनी सांगितलंय. ''कारण त्या रहस्यमय वातावरणाचा ही नग्नता एक महत्त्वाचा भाग आहे याची जाणीव त्यांना होती. पण म्हणून हा सिनेमा नग्नतेविषयी नाही, हेही त्यांना समजलं. आम्ही त्याकडे एक कॉस्च्युम ड्रामा म्हणून बघितलं. कपडे न घालणं हीसुद्धा एक वेशभूषाच आहे, असं म्हटल्यानंतर त्यात खटकण्यासारखं काही राहतच नाही.''

आयुष्यात दु:खाला सामोरं जाण्याविषयीचा हा सिनेमा म्हणूनच आगळा ठरतो.

०००

'द वीझल्स टेल' हा अर्जेन्टिनाचा सिनेमा. दिग्दर्शक आहेत हुआन होसे काम्पानेला.

गेल्या वर्षी इफ्फीमध्येच अर्जेन्टिनाचा दिग्दर्शक गॅस्तन द्युपार्त यांचा 'माय मास्टरपीस' नावाचा एक उत्तम सिनेमा बघितला होता. विनोदी, पण तरीही खूप काही सांगून जाणारा. 'द वीझल्स टेल' पाहायचं ठरवलं ते केवळ तो अर्जेन्टिनाचा होता आणि त्याचं कथासार विनोदी वाटलं म्हणून. या देशाच्या विनोदाच्या जातकुळीविषयी काही समजतंय का, असाही एक विचार मनात होताच. शिवाय, २०१०मध्ये दिग्दर्शक काम्पानेला यांच्या 'द सीक्रेट इन देअर आईज' या सिनेमाला सर्वोत्तम परदेशी सिनेमाचं ऑस्कर मिळालं होतं. त्यानंतर इतक्या वर्षांनी त्यांनी हा नवा सिनेमा केला, ही माहितीसुद्धा महत्त्वाची होतीच.

'द वीझल्स टेल' हा १९७६ च्या मार्टिनेझ सुआरेझ या नामवंत दिग्दर्शकाच्या 'यस्टरडेज गाईज युज्ड नो आर्सेनिक' या अतिशय गाजलेल्या सिनेमाचा रिमेक आहे. मात्र, त्या सिनेमाची सर या सिनेमाला नाही, असं तो बघितलेल्यांचं मत आहे.

कोणे एके काळी सुपरस्टारपद अनुभवलेली उतारवयातली मारा. तिचा व्हीलचेअरवर असलेला, कोणे एके काळी छोट्या-मोठ्या भूमिका केलेला पती पेद्रो. जुन्या जमान्यातला पटकथालेखक मार्टिन. आणि माराच्या काही सुपरहिट सिनेमांचा दिग्दर्शक नॉरबेर्तो. हे चार म्हातारे एका भल्या-मोठ्या बंगल्यात एकत्र राहताहेत. निवृत्तीनंतरचं आयुष्य शांततेत घालवणं ही सर्वसाधारणपणे निवृत्त लोकांची इच्छा असली, तरी इथे सगळं इतकं सोपं नाही. सिनेमाच्या सुरुवातीलाच नॉरबेर्तो आपल्याला बंदुकीने वीझल्स मारताना दिसतो. हा कोंबड्या खाणारा एक हिंस्र प्राणी. रात्रीच्या त्या शांत, अंधाऱ्या वातावरणात बंदुकीचा आवाज मारालाच नव्हे, आपल्यालाही दचकवतो.

एकमेकांबरोबर काम केलेलं असल्यामुळे, एकमेकांचे गुण-दुर्गुण माहीत असल्यामुळे आणि एकमेकांना अंतर्बाह्य ओळखत असल्यामुळे या मैत्रीत गोडव्याबरोबर कडूपणाही आहे. एकमेकांना उपहासाने बोलणं आहे. एकमेकांच्या कमकुवतपणाविषयी बोचकारणं आहे. एकमेकांना त्रास देणं आहे. मार्टिन आणि नॉरबेर्तो यांच्या बायका त्यांच्याबरोबर का नाहीत, असा प्रश्न आपल्याला पडतो; पण कालांतराने त्याचं उत्तरही मिळतं. पेद्रोने



त्याच्या मते अतिशय देखणी, पण भीषण अशी त्यांची काढलेली पोर्ट्रेट्स आपल्याला दिसतात. आपलं आयुष्य अगदी संथ चाललंय आणि त्यात आता एका व्हिलनची गरज आहे, असं मार्टिन म्हणतो आणि बंगल्याच्या आवारात एक गाडी शिरते.

एक तरुण मुलगी बार्बरा आणि मुलगा फ्रॅन्सिस्को, 'रस्ता चुकलोय' असं म्हणून या बंगल्यात येतात. (कोणती व्यक्तिरेखा कोणत्या प्रकारे वागणार, हे दिग्दर्शक आपल्यापासून जराही लपवू मागत नाही.) बंगला पाहून माराला तो विकण्यासाठी राजी करू बघतात. तिने पुन्हा आपलं करिअर सुरू करावं, म्हणून तिला भरीला घालू लागतात. माराचं मन तिथे झुकतंय हे दिसू लागल्यावर तिघे मित्र एकत्र येतात आणि मग जणू काही सिनेमाची कथा लिहावी, दिग्दर्शित करावी आणि अभिनित करावी, अशा जोमाने बार्बरा आणि फ्रॅन्सिस्कोला हरवण्याच्या तयारीला लागतात. त्यासाठी कोणत्याही स्तराला जायची त्यांची तयारी असते.

या सिनेमाची हाताळणी विनोदी पद्धतीने तर केलेली आहेच, पण पडद्यावर घडलेली गोष्ट ही नाटकासारखी पेश केलीये असं वाटत राहतं. त्यातली दृश्यं, संवाद, बदलणारी लोकेशन्स नाटकातल्यासारखी आहेत. बंगल्यातल्या खोल्यांमध्ये जुन्या सामानाची गर्दी आहे. त्यामुळे आपण नाटकाच्या सेटवर असल्याची भावना होते. संवाद अतिशय धारदार आहेत. एकूणच, या चार म्हाताऱ्यांच्या करामती इतक्या 'ओव्हर द टॉप' म्हणाव्यात अशा आहेत की, आपल्याला त्या पाहताना मजा येत राहते.

सिनेमाच्या सुरुवातीलाच आपलेच जुने सिनेमे पाहून रडणारी मारा असो, की आपला मित्र वाईट ॲक्टर आहे म्हणून आपल्या कथेतला क्लायमॅक्स त्याला न सांगणारे मार्टिन आणि नॉरबेर्तो असोत– त्यांचं तिरकस वागणं कथेला टोक आणतं. 'वय झालं म्हणून आम्हाला मोडीत काढू नका' हे ठासून सांगतं.

'पॅट्रिक' काय किंवा 'द वीझल्स टेल' काय, रोज चार चार सिनेमे पाहताना थोडं रिलॅक्स करतात. थिएटरमधून बाहेर पडताना प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर एक छोटं हसू असतं. एक चांगला अनुभव मिळाल्याचं समाधान असतं.

**मीना कर्णिक,** मुंबई
meenakarnik@gmail.com
Mob. 9819767518

*(पुढील अंकात – शेवटच्या लेखात– महोत्सवामधील आणखी दोन उत्तम सिनेमांविषयी)*

# चर्चासत्र : हमीद दलवाई यांचे साहित्य व समाजकार्य

## १३ व १४ डिसेंबर २०१९
## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



उद्घाटक राजन गवस भाषण करताना, बसलेले डावीकडून - नंदकुमार मोरे, रणधीर शिंदे, सुभाष जोशी, विनय हर्डीकर, भारती पाटील ▲

'मुस्लिम सामाजिक सुधारणा' या सत्राच्या प्रारंभीचा क्षण...
डावीकडून सुनीलकुमार लवटे, अन्वर राजन, सय्यदभाई, समीर शेख, इक्बाल मुल्ला ▼



# अकाउंटिंग क्षेत्रातील करिअरसाठी क्लिक् कोर्सेस!



MKCL
Tally with GST
Gateway to Knowledge Lit Careers

**MKCL चे जॉब ओरिएंटेड कोर्सेस**

MKCL
Advanced Excel
Gateway to Knowledge Lit Careers

MKCL
C++
Gateway to Knowledge Lit Careers

MKCL
IT Hardware Support
Gateway to Knowledge Lit Careers


MS-CIT
अभ्यासक्रम आता दोन पर्यायात
1. Job Readiness
2. IT Awareness
Job Readiness साठी
IT कौशल्ये शिकून रोजगारक्षमता
वाढवण्यासाठी
IT Awareness साठी
IT कौशल्ये शिकून डिजिटल
युगात आत्मविश्वासाने
पुढे जाण्यासाठी
इंग्रजी संवाद व व्यक्तिमत्व विकास
MKCL KLiC English
Gateway to Job Success
नव्या करियर्सचे प्रवेशद्वार
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कॉम्प्युटर कोर्स
जॉब ओरिएंटेड क्लिक् कोर्सेस
MKCL KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers

# चर्चासत्र : हमीद दलवाई यांचे साहित्य व समाजकार्य

१३ व १४ डिसेंबर २०१९

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



▲ 'दलवाई यांचे कथात्म साहित्य' या सत्रात डावीकडून नीतीन रिंढे, प्रवीण बांदेकर, रझिया पटेल

▼ समारोपाच्या सत्रातील प्रारंभीचा क्षण – डावीकडून रणधीर शिंदे, राजन गवस, विनय हर्डीकर, सदानंद मोरे, न्या. हेमंत गोखले, स्वयंसेवक विद्यार्थिनी, विनोद शिरसाठ, नंदकुमार मोरे



वृत्तांत

नंदकुमार मोरे

# कोल्हापूर येथील चर्चासत्र

'हमीद दलवाईंचे साहित्य आणि समाजकार्य' या विषयावर १३ व १४ डिसेंबर २०१९ असे दोन दिवस कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न झाले. विद्यापीठाचा मराठी विभाग, साधना साप्ताहिक आणि हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने ते आयोजित करण्यात आले होते. आठ सत्रांमध्ये झालेल्या या चर्चासत्रात हमीद दलवाई यांच्या वाङ्मयीन व सामाजिक कार्याबद्दल गंभीरपणे आणि सविस्तर चर्चा झाली. या चर्चेचा सूर 'हमीद दलवाई हे कोणा एका धर्मीयांसाठी नव्हे, तर मानवी कल्याणासाठी सतत झटणारे कार्यकर्ते होते; त्यामुळे त्यांच्या विचारांची गरज जगातील धार्मिक, सामाजिक आणि स्त्रीप्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सार्वकालिक आहे,' असा होता. विविध मानवी प्रश्न धर्मांच्या स्थापनेपूर्वीपासून होते, धर्मस्थापनेनंतर काही प्रश्न निर्माण झाले, अशा अनेक प्रश्नांच्या गुंतावळीत मानवी जीवन खुंटले, त्यामुळे दलवाईंचे विचार धर्माच्या पलीकडे जाऊन अभ्यासणे गरजेचे आहेत, हे या चर्चेचे सूत्र होते.

हमीद दलवाई यांना अवघे पंचेचाळीस वर्षांचे आयुष्य लाभले. या अल्पायुष्यात त्यांनी 'इंधन' ही महत्त्वाची कादंबरी आणि चाळीस कथा लिहित्या. तसेच त्यांच्या गंभीर वैचारिक लेखनाचे तीन संग्रह प्रकाशित झाले असून, त्यांनी शेकडो भाषणे दिली आहेत. मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना हे त्यांच्या आयुष्यातील सर्वांत महत्त्वाचे कार्य. त्यांनी मुस्लिम समाजाच्या सुधारणेसाठी मूलभूत चिंतन आयुष्यभर केले. आणि त्यासाठी प्रत्यक्ष कामही केले. हे चिंतन त्यांच्या सर्वच लेखनातून प्रतिबिंबित होते. हमीद दलवाई मळलेली वाट सोडून चालले, त्यामुळे त्या वाटेत खाचखळगे लागणे स्वाभाविक होते. त्यांनी स्वीकारलेली वाट नवी, म्हणूनच संघर्षाची होती. या वाटेवरील व्रत 'प्रबोधन' हे होते. त्यासाठीच ते संघर्षरत राहिले. त्यांच्या या कार्याची ओळख आणि त्यांच्या विचारांची समकालीन प्रस्तुतता अधोरेखित करणे, हा या चर्चासत्राच्या आयोजनामागील मुख्य उद्देश होता.

चर्चासत्राचे उद्घाटन ज्येष्ठ लेखक राजन गवस यांनी केले. यावेळी त्यांनी व्यक्त केलेले मनोगत आयोजकांची भूमिका अधोरेखित करणारे होते : ''हमीद दलवाईंवरील हे चर्चासत्र शिवाजी विद्यापीठात व्हावे, हे मला मनस्वी वाटत होते. दलवाईंचे कोल्हापूरशी अतिशय स्नेहाचे व विचारांचे नाते होते. त्यामुळे दलवाईंचा कोल्हापुरातील वावर आमच्यासाठी महत्त्वाचा ठरणारा असायचा. आज येथे हमीद दलवाईंच्या कार्यावर चर्चासत्र होणे, हे शिवाजी विद्यापीठासह कोल्हापूरसाठी अनेकार्थाने अत्यंत महत्त्वाचे आहे. यामागचे कारण म्हणजे, दलवाई हे विद्यापीठीय अभ्यासक्रमातून बाजूला पडलेले लेखक आहेत. दलवाईंनी नेमके आणि मोजकेच लिहिले. शिवाजी विद्यापीठानेच त्यांची 'इंधन' कादंबरी अभ्यासक्रमात प्रथम समाविष्ट केली. कोणत्याही लेखकाने स्वत:ला खरवडून काढलं पाहिजे. दलवाईंचे लेखन असे स्वत:ला खरवडून लिहिले गेले आहे. एक कार्यकर्ता म्हणून ते इतरांपेक्षा वेगळे होतेच. परंतु लेखक म्हणूनही या माणसाकडे अद्वितीय सामर्थ्य असल्याचे मी भाऊ पाध्येंसारख्या महान लेखकांकडून ऐकले होते. याचा प्रत्यय पुढे त्यांच्या लेखनातून आम्हाला आला... कोल्हापूरचा

सलोखा व शांतता टिकवून ठेवण्यामध्ये राजर्षी शाहूंपासून अनेकांचे योगदान लाभले आहे. हमीद दलवाईंचे मुस्लिम सत्यशोधक चळवळीतील काम विचारात घेत असताना मला नेहमीच एक प्रश्न पडतो. दलवाईंचे आणि सूफींचे नाते नेमके काय असावे? सूफींचे येथील समाजरचनेतील योगदान महत्त्वाचे आहे. त्यामुळे दलवाईंच्या सामाजिक कार्याचा विचार करत असताना सूफींच्या दलवाईंशी असलेल्या नात्याचा शोध घेतला पाहिजे. अलीकडे काहींना अध्यात्य या शब्दाची ॲलर्जी वाटू लागली आहे. अशा परिस्थितीत धर्माच्या अभ्यासाचा अवकाशच कोणी तरी पळवला. त्यामुळे काही गोष्टींचा पुनर्विचार आपण करणार आहोत की नाही? या समाजाला एकदम निधर्मी करणं, की पायरी पायरीनं त्याकडे घेऊन जाणं आवश्यक आहे, हे चळवळीतील कार्यकर्त्यांनी समजून घेतले पाहिजे. कोणी अध्यात्माचा उच्चार जरी केला तरी ते टीकेचे धनी होतात, त्यामुळे अनेक गुंते तयार झाले आहेत.''

उद्‌घाटकांच्या मनोगतानंतर चर्चासत्राचे बीजभाषण विनय हर्डीकर यांनी केले. हमीद दलवाईंच्या विचारांची कालातीत प्रस्तुतता अधोरेखित करताना ते म्हणाले, ''हमीद दलवाईंचे कार्य प्रथम महाराष्ट्रापुरते मर्यादित असले, तरी नंतर ते वाढत अखिल भारतीय झाले आहे. दलवाईंचे 'मुस्लिम पॉलिटिक्स इन इंडिया' हे पुस्तक सेक्युलर भारताचा मॅनिफेस्टो आहे. हे कम्युनिस्ट मॅनिफेस्टोपेक्षा छोटं पुस्तक आहे, परंतु ते त्या पुस्तकाइतकेच स्फोटक ताकद असलेले आहे. आपण भारतीयांनी 'सेक्युलर' या शब्दावर अत्याचार केला आहे. घोळघालू भारतीयांसाठी 'सेक्युलर' या शब्दाचा अर्थ 'सर्वधर्मसमभाव' असल्याचे ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीवाल्यांनी स्वतंत्रपणे लिहिले आहे. यातून त्यांनी भारतीयांचे कौतुक करण्याऐवजी टोमणा मारला आहे. 'सेक्युलर' या शब्दाचा खरा अर्थ 'निधर्मी' असा आहे.''

हमीद दलवाई का आवश्यक आहेत हे सांगताना, ते नेमके केव्हा-केव्हा असायला हवे होते, याची एक यादीच हर्डीकर यांनी दिली. ते म्हणाले : ''भारतात वैदिक आणि बौद्ध एकमेकांची डोकी फोडायला उठले होते, तेव्हा दलवाई असायला हवे होते. ज्या वेळेला गीतेसारखे स्तोत्र लिहिले गेले- चातुर्वर्ण्यव्यवस्थेत तुमच्या वाट्याला जे आले आहे आणि त्याच्याप्रमाणेच जगायचे, असे सांगितले जात होते- तेव्हा दलवाई हवे होते. युरोपमध्ये ज्यू आणि ख्रिश्चनांमध्ये धर्मछळ झाला, तेव्हा दलवाई असायला हवे होते. देवाकडे जो वस्तुनिष्ठ पद्धतीने पाहील त्यांना आम्ही रिपब्लिकच्या बाहेर ठेवू, असे जेव्हा प्लेटोने सांगितले, तेव्हा हमीद दलवाई असायला हवे होते. ख्रिश्चन लोक गरीब चिन्यांना औषध म्हणून अफू पाठवायचे, तेव्हा दलवाई हवे होते. एका धर्मातून दुसऱ्या धर्मात जाऊन फार काही फरक पडेल असे वाटत नाही- तुम्ही जे सांगताहात ती बुद्धाची शिकवण नाही, असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना सांगायला दलवाई हवे होते. प्रत्येक धर्म शोषणाचे साधन आहे, हे दलवाईंचे म्हणणे कदाचित गांधी-आंबेडकरांना पटले असते.''

पाऊण तासाच्या बीजभाषणाचा समारोप करताना ते म्हणाले, ''हमीद दलवाई हे विद्वान, मिश्किल व स्पष्टवक्ते होते. त्यांचे कार्य मुस्लिम समाजापुरते सीमित न राहता, ते अखिल मानवजातीच्या कल्याणासाठीचे होते. जगात जेथे-जेथे मानवी अस्तित्वासंबंधी धर्मामुळेच काही गंभीर प्रश्न निर्माण होतील, तेव्हा निधार्मिक विचारधारेने चिकित्सा करणाऱ्या दलवाईंसारख्या माणसाची गरज भासत राहणार आहे. दलवाईंचे विचार हे सेमिनारच्या चौकटीत बसवणे तितके सयुक्तिक वाटत नाही. सेमिनारच्या कक्षेबाहेर येऊन आपण त्यांच्या विचारांचा जागर करणे गरजेचे आहे. शिवाय त्यांना दीर्घायुष्य लाभले असते, तर मुस्लिम समाजाचे सत्यशोधन करणाऱ्या दलवाईंनी विज्ञानाच्या आधाराने हिंदू समाजाचेही सत्यशोधन केले असते.''

उद्‌घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र शाखेच्या अधिष्ठाता प्रा.डॉ.भारती पाटील होत्या. त्या आपल्या अध्यक्षीय मनोगतात म्हणाल्या, ''दलवाई हा भारतातील एक महत्त्वाचा विचार आहे. आज लेखक-विचारवंतांचे आवाज दाबले जात आहेत. अशा काळात हे चर्चासत्र आयोजित करून मराठी विभागाने एक महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. आपली प्रागतिक ओळख कायम ठेवली आहे. वास्तविक, दलवाईंचा विचार अधिकाधिक शैक्षणिक विचारपीठांवरून चर्चिला जावा असा आहे. तो केवळ मराठीच नव्हे; तर समाजशास्त्र, राज्यशास्त्र विभागांमार्फतही विद्यार्थ्यांसमोर येणे गरजेचे आहे. मी स्वत: स्त्री-पुरुष समानतेसाठी झगडणारी कार्यकर्ता आहे. त्यामुळे दलावाईंच्या विचारांचे मोल मला आहे. दलवाईंचा विचार हा मैलाचा दगड आहे, त्यामुळे तो अनेक अंगांनी समाजाला चिरकाल उपयुक्त व दिशादर्शक ठरणारा आहे.''

या सत्राचे प्रास्ताविक मराठी विभागाचे प्रमुख प्रा.रणधीर

शिंदे यांनी केले. चर्चासत्रातील भूमिका साधनाचे संपादक विनोद शिरसाठ यांनी मांडली आणि रामचंद्र गुहा यांचा संदेश वाचून दाखवला.

हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूटच्या अध्यक्षा इला दलवाई उपस्थित राहू न शकल्याने, त्यांच्या मनोगताचे वाचन रुबिना दलवाई यांनी केले. आभारप्रदर्शन नंदकुमार मोरे यांनी केले.

उद्घाटनाच्या सत्रानंतर हमीद दलवाईंच्या मुलाखतीचे नाट्यरूप सादरीकरण झाले. हे सादरीकरण चर्चासत्रात लक्षवेधी ठरले. मुकुंदराव किर्लोस्कर यांच्या 'मनोहर' साप्ताहिकात २६ ऑगस्ट १९७३ च्या अंकात हमीद दलवाई यांची मुलाखत प्रकाशित झाली होती. या काळात 'मनोहर' साप्ताहिकाचा खप पन्नास हजारांहून अधिक होता. मनोहर साप्ताहिकात लोकांकडून प्रश्न मागवून घेऊन ते निमंत्रित व्यक्तीला विचारले जात असत. जुलै १९७३ मध्ये वाचकांना निवेदन करून त्यांच्याकडून हमीद दलवाईंसाठी प्रश्न मागवून घेतले गेले होते. महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यातून आलेल्या प्रश्नांची हमीद दलवाईंनी अत्यंत मर्मग्राही व चिंतनशील उत्तरे दिली होती. तिरकस व खोचक अठ्ठावीस प्रश्नांच्या उत्तरांतून दलवाईंच्या व्यापक, निर्भय व तर्कशुद्ध दृष्टिकोनाचे दर्शन घडते. हे प्रश्न आणि त्याला दलवाईंनी दिलेली उत्तरे असे या प्रयोगाचे स्वरूप होते. दलवाईंच्या भूमिकेत सहास पाटील तर प्रश्नकर्त्या वाचकांच्या भूमिकेत हिनाकौसर खान, समीर शेख, गणेश दळवी व सौरभ बागडे हे चार तरुण होते.

त्याच सत्रात मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष शमसुद्दीन तांबोळी यांनी 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ : काल आणि आज' या विषयाची मांडणी केली. ते म्हणाले, ''हे चर्चासत्र एका अर्थाने सत्यशोधक मंडळासाठी विस्तारकार्यच आहे. हमीद दलवाईंच्या आणि मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्याची काल, आज आणि उद्याच्या अनुषंगाने गरज अधोरेखित करणारी चर्चा घडवून आणण्याचे महत्त्वपूर्ण काम शिवाजी विद्यापीठाकडून केले जात आहे. हे विद्यापीठ इतर विद्यापीठांपेक्षा वेगळे आहे, कारण इतिहास विभागानेही आपल्या अभ्यासक्रमात मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेची व कार्याची दखल घेतलेली आहे. मुस्लिम सत्यशोधक मंडळ हे इस्लामच्या इतिहासातील एक अद्वितीय चळवळ असून,

तरुण पिढीचे व अनुवादकांचे मनोगत –
डावीकडून समीर शेख, सुनीलकुमार लवटे, हिनाकौसर खान, अझरुद्दीन पटेल आणि बोलताना दीपाली अवकाळे



अशा स्वरूपाची कोणतीच चळवळ जगभरामध्ये नाही. हे मंडळ लवकरच पन्नासाव्या वर्षात पदार्पण करत आहे. दलवाईंनी लावलेल्या पणतीची आम्ही मशाल करू शकलो नाही याची खंत वाटते, परंतु ही पणती आम्ही विझू न दिल्याचा आनंदही आहे. दलवाईंच्या नेतृत्वात १९६६ मध्ये केवळ सात मुस्लिम महिलांचा मोर्चा निघाला होता, तरीही तो स्फोटक ठरला होता. आज देशभरात महिलांच्या जवळपास सत्तर संघटना कार्यरत आहेत. या चळवळीने अनेकांचे जीवन बदलवले आहे. रिक्षावाल्याच्या मुलाला आयएएस अधिकारी बनवलेली ही संघटना आहे.''

तिसऱ्या सत्रात 'मुस्लिम समाजातील सुधारणा : काल आणि आज' या विषयावर इक्बाल मुल्ला, अन्वर राजन आणि सय्यदभाई यांनी आपले विचार मांडले. मुस्लिम समाजात सुधारणेसाठी काम करणारे हे तिघेही कार्यकर्ते हमीद दलवाई यांच्या विचारांचे वारसदार. इंग्रजांच्या आगमनानंतर आलेल्या नव्या विचारातून, संस्कृतीतून जो आधुनिक विचार येथे रुजला; त्याचा भाग म्हणून फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांकडे पाहताना येईल. मुस्लिम समाजामध्ये अशा विचारांची क्रांती दलवाईंच्या रूपाने आपल्याला पाहायला मिळते, असा या चर्चेचा सूर होता. समीर शेख या तरुणाने घेतलेल्या मुलाखतीत सय्यदभाई म्हणाले, ''जीवनात आलेल्या अनुभवांमुळे मी धर्मचिकित्सेकडे वळलो. धर्मातील फोलपणा कळला आणि माझा धर्मावरील विश्वासही उडाला. बहिणीचा तलाक हा माझ्या जीवनात आलेला सर्वांत दाहक अनुभव होता. मला माझ्या व्यक्तिगत आयुष्यातील प्रश्नांवर समाधानकारक उत्तरे शोधता येत नव्हती, त्यामुळे मी अस्वस्थ होत असे. त्या वेळी धर्मापेक्षा मानवी मूल्यांवर प्रेम करणारे तत्त्वज्ञान दलवाईंमुळे कळाले. म्हणूनच आयुष्यात या माणसाची साथ कधीच सोडली नाही.'' आजच्या पिढीतील कार्यकर्त्यांना सल्ला देताना ते म्हणाले, ''तरुण मुले या चळवळीत येत असल्याने उत्साहाचे वातावरण निर्माण होत आहे. आज वय झालेल्या माणसांनी थोडे पाठीमागे सरकावे आणि मंडळातून नव्याने घडणाऱ्या कार्यकर्त्यांकडे कामाची जोखीम द्यावी. या चळवळीला मोठे भवितव्य आहे.''

त्यानंतर दलवाई यांच्या ललित लेखनाबद्दलचे सत्र झाले. कादंबरीकार प्रवीण बांदेकर आणि मराठीतील एक महत्त्वाचे समीक्षक नितीन रिंढे यांच्या अभ्यासपूर्ण मांडणीसाठी हे सत्र लक्षात राहणारे ठरले. या दोघांनीही अभ्यासपूर्ण भाषणे दिली. प्रवीण बांदेकर म्हणाले, ''भारतीम मुस्लिम समाजाला केंद्रस्थानी ठेवून चालवलेल्या आपल्या प्रबोधनपर चळवळींना पूरक ठरणारे वैचारिक साहित्य लिहिणाऱ्यांमध्ये हमीद दलवाई यांचा समावेश करावा लागेल. अन्य कोकणी लेखकांपेक्षा त्यांचे असलेले वेगळेपण प्रामुख्याने त्यांच्या लेखनातून जाणवणाऱ्या बहुजनाभिमुख आणि वास्तववादी भूमिकेत आहे. हमीद दलवाई हे थेटपणे मुस्लिम सुधारणावादी चळवळींशी जोडले गेले होते. त्यांचे सर्जनशील कथात्म व वैचारिक लेखन परस्परांना आणि दलवाई यांच्या सामाजिक-राजकीय भूमिकेला पूरक ठरणारेच होते. दलवाई यांच्या कथात्म साहित्याबाबत विचार करताना माझ्यासारख्या लेखकाला त्यांच्याशी जोडून घेणारी एक महत्त्वाची गोष्ट आहे, ती म्हणजे- लेखकाची लेखनांतर्गत नैतिकता. लेखकाने एखाद्या सामाजिक प्रश्नाविषयी लिहिलं की, त्याची जबाबदारी संपते का? की, त्याने गरज पडली तर रस्त्यावर उतरून लढण्याचीही तयारी ठेवली पाहिजे? मराठी साहित्याच्या संदर्भात तर- लेखक कसलीही बांधिलकी मानत नाहीत, कुठल्याही सामाजिक प्रश्नावर ठोस भूमिका घेत नाहीत, मराठी लेखकांकडे स्वतःचा असा राजकीय विचार नसतो, सामाजिक तत्त्वज्ञानाचा अभाव असतो- असे नेहमीच बोलले जाते. या पार्श्वभूमीवर दलवाईंसारख्या लेखन आणि जगणे यात जराही अंतर न मानणाऱ्या लेखकाचे लेखन निश्चितच वेगळे ठरणारे आहे. एकूणच, दलवाईंच्या सगळ्याच कथात्म साहित्यामधून दिसणारे मानवी नातेसंबंधांचे चित्रण, भाव-भावनांचा गुंता, विविध वृत्ती-प्रवृत्तींचे दर्शन विलक्षण आहे.''

नीतीन रिंढे यांनी 'इंधन'वर सविस्तरपणे आपली मते मांडली. ही कादंबरी कशी वाचावी, याबद्दलचे चिंतन आपल्या मनोगतातून व्यक्त करताना ते म्हणाले, ''एक राजकीय कादंबरी म्हणून इंधन महत्त्वाची आहे. बदलत्या समाजवास्तवाचे भान असलेली ही कादंबरी काळाच्याही पुढे होती. जगण्याचे गुंते विलक्षण पद्धतीने या कादंबरीतून मांडण्यात आले आहेत. स्त्रीवादी दृष्टिकोनातून सामाजिक परिस्थितीचे वाचन करणारी ही एक महत्त्वाची कादंबरी आहे. सेवादलाचे संस्कार घेऊन राजकारणात शिरलेल्या नायकाच्या नजरेतून ही कादंबरी पारंपरिक मूल्यव्यवस्थेशी भांडत काही महत्त्वाची विधाने करू पाहते.''

या सत्राचे अध्यक्षीय मनोगत रझिया पटेल यांनी

विस्ताराने केले. त्यात त्यांनी दलवाईंच्या ललित लेखनाचे महत्त्व अधोरेखित केले. याच सत्रात हमीदभाईंचे कोल्हापूरशी असलेले नाते ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुरेश शिपूरकर यांनी उलघडून दाखवले. यदुनाथ थत्ते यांच्या सांगण्यावरून दलवाईंना कोल्हापूरच्या मुस्लिम मोहल्ल्यांमधून फिरवण्याचे काम प्रारंभी त्यांनी केले होते. या कार्याचा इतिहास शिपूरकर यांनी आपल्या अल्प मनोगतातून कथन केला.

पहिल्या दिवसाच्या अखेरच्या सत्रात ज्योती सुभाषनिर्मित 'द अनसंग ह्युमॅनिस्ट' हा हमीद दलवाईंवरील माहितीपट दाखवण्यात आला. यानिमित्ताने ज्योती सुभाष यांचे मनोगत झाले. या वेळी त्या म्हणाल्या, ''हमीद दलवाई यांच्याबद्दल मला जे काम थोडेफार माहिती आहे, ते सांगण्यासाठी हा माहितीपट बनवला. हमीद दलवाईंबद्दल सर्वच सांगू शकले नाही; परंतु दलवाई ज्यांना माहितीच नाहीत, अशांसाठी त्यांचे व्यक्तिमत्त्व समजण्यास हा माहितीपट उपयुक्त ठरेल. दलवाईंना मी फारशी भेटलेली नसतानाही त्यांचे साहित्य वाचून त्यांच्याशी जोडली गेले. ते जादूई व्यक्तिमत्व होते.''

चर्चासत्राच्या दुसऱ्या दिवशी 'दलवाईंच्या लेखनाचे अनुवाद' या विषयाने चर्चेला प्रारंभ झाला. प्रारंभी लेखक सुनीलकुमार लवटे यांनी गौरी पटवर्धन यांचे लिखित पत्र वाचून दाखवले. त्यांनी 'इंधन'च्या उर्दू अनुवादासाठी अजमल कमाल यांना मदत केली होती. जमीला जावद या कथासंग्रहाचा इंग्रजी अनुवाद ज्यांनी जवळपास पूर्ण केला आहे, त्या दीपाली अवकाळे म्हणाल्या, ''नसिरुद्दीन शहांसारखे लोक केवळ मराठी भाषा येत नाही, म्हणून दलवाईंच्या विचारांपासून वंचित राहतात, हीच गोष्ट मला अनुवादाकडे वळवणारी होती.'' याच सत्रात 'नव्या पिढीचे मनोगत' व्यक्त करण्यासाठी अझरुद्दीन पटेल, हिनाकौसर खान व समीर शेख या तिघांना आमंत्रित केले होते. दलवाईंचे साहित्य आजही काळाशी जोडणारे- रेलेव्हंट आहे; मुस्लिम समाजाइतकीच हिंदू समाजालाही दलवाईंच्या विचारांची गरज असल्याचे मत या तरुणांनी व्यक्त केले. समीर म्हणाला, ''दलवाईंविषयी द्वेष हा त्यांच्या विचारांपासून अनभिज्ञ असल्याने पसरत आहे. म्हणून त्यांचे विचार काय आहेत, हे लोकांपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. दलवाई हे विवेकवादाची आणि सर्वधर्मसमभावाची लिटमस टेस्ट आहेत. लेखनात आणि कृतीत फरक नसणाऱ्या दलवाईंना पुढे नेण्याचा अट्टहास आपण केला पाहिजे.'' या सत्राचे अध्यक्ष डॉ.सुनीलकुमार लवटे होते. त्यांनी दलवाईंच्या साहित्याचे विविध भारतीय भाषांमध्ये अनुवाद होण्याची आवश्यकता अधोरेखित केली.

'तरीही मी मुसलमान आहे' या मुलाखतीचे नाट्यरूप सादर करताना- सुहास पाटील



चर्चासत्राच्या समारोपामध्ये डॉ.सदानंद मोरे आणि न्या.हेमंत गोखले यांची भाषणे झाली. प्रारंभी विनोद शिरसाठ यांनी चर्चासत्र, दलवाई आणि साधनाने सुरू केलेल्या कार्याबद्दल विस्ताराने भूमिका मांडली. ही भूमिका चर्चासत्र आयोजकांची एकत्रित म्हणावी अशी होती. हे चर्चासत्र पुढच्या कृतिकार्यक्रमाचा प्रारंभ आहे, असे सांगून नव्या कार्यासाठी अनेक संस्था व संघटनांनी पुढे यावे असे आवाहन त्यांनी केले.

सदानंद मोरे यांनी आपल्या मनोगतात हमीद दलवाई यांच्या विचारांची जागतिक स्तरावरील प्रस्तुतता सांगितली. ते म्हणाले, ''दलवाई हे केवळ कोकणाचे किंवा महाराष्ट्राचे नाहीत, तर वैचारिक दृष्ट्या ते अखंड भारताचे होते. १९९२ च्या बाबरी मशिदीच्या प्रकरणानंतर किंवा अलीकडे २०१४ नंतरच्या संवेदनशील परिस्थितीत हमीद दलवाई असते, तर त्यांनी महाराष्ट्राच्या किंवा भारताच्या संदर्भात आपल्या विचारांची मांडणी न करता, जागतिक भूमिकेतून आपले विचार मांडले असते. जागतिक पातळीवरील इस्लामच्या स्थितीचा विचार करून आपल्याला त्याबद्दल काही म्हणता येईल का, याचा विचार इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूटने करावा. तसे म्हणण्याइतकी सामग्री दलवाईंच्या विचारांमध्ये आपल्याला सापडते. धर्माच्या बाहेर जाऊन धर्माबद्दल बोलण्याची सोय इस्लाममध्ये नाही. अशा वेळी सुधारकांनी काय करावे, हा प्रश्न असतो. अशा वेळी दलवाईंच्या कामाचे मोल लक्षात येते. 'मी मुसलमान आहे' असे सांगून इस्लाम धर्माचे ग्रंथप्रामाण्य झुगारून इस्लामची चिकित्सा करणारे दलवाई एकमेव मुस्लिम होते. 'अँग्री यंग सेक्युलॅरिस्ट' या पुस्तकातील लेखात नरहर कुरुंदकरांनी 'दलवाईंच्या कार्याची तुलना करायची झाली तर काही बाबतीत फुल्यांशी करता येऊ शकेल,' असे म्हटले आहे. तेव्हा दलवाईंचे एकाकीपण सोडवण्याचे काम इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूटसह आपण सर्वांनी करणे आवश्यक आहे.'

न्या.हेमंत गोखले म्हणाले, ''पुरोगामी विचारांना समर्थन देण्याची शिवाजी विद्यापीठाची परंपरा आहे. हमीद दलवाई यांनी साहित्य आणि समाज या दोन्हींमध्ये कधीच द्वंद्व निर्माण केले नाही. साहित्यातून विचार मांडत-मांडत ते समाजाकडे पोहोचले. अतिशय गरिबीतून पुढे आलेल्या दलवाईंच्या लेखनातून कोकणातील मुसलमानांचे दारिद्र्य आले आहे. त्यांच्या साहित्यातून मुस्लिम राजकारण आणि गोरगरीब मुसलमानांची मनोवस्था प्रकट होताना आढळते. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर भारताचे चित्र अतिशय बारकाव्याने दलवाईंनी आपल्या लेखनातून उभे केले आहे. आज चाळीस वर्षांनंतरही दलवाईंच्या काही विचारांची निकड भासू लागली आहे. त्यांच्या काळात आजच्याइतका मुस्लिम समाज असुरक्षित नव्हता. लीचिंग, लव्ह जिहाद, सिटिझनशिप, एनआरसी या सगळ्या प्रकरणांमुळे आज समाजामध्ये दुभंगलेपण निर्माण झाले आहे. अशा वेळी पुरोगामी विचारधारा नेमकी कशी पुढे न्यायची, याचा विचार हिंदू व मुस्लिम पुरोगामी लोकांनी गांभीर्याने करणे गरजेचे आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनंतर देशाला पुढे नेणारी दोन महाराष्ट्रीय माणसे म्हणजे हमीद दलवाई व डॉ.नरेंद्र दाभोलकर हे होत. परंतु, या दोघांच्या मृत्यूनंतर त्यांना अपेक्षित परिवर्तन समाजात घडू लागले, हे फार आशादायक चित्र आहे.''

दीड दिवस चाललेल्या या चर्चासत्रात दोन डझनापेक्षा अधिक वक्ते बोलले. प्रत्येक सत्राला शंभर ते दोनशे श्रोत्यांची उपस्थिती होती. त्यात प्राध्यापक, साहित्यिक, कार्यकर्ते व विद्यार्थी यांचा सहभाग प्रामुख्याने होता.

निमंत्रित वक्त्यांपैकी फक्त चंद्रकांत पोकळे ऐनवेळी आजारी पडल्याने येऊ शकले नाहीत. सर्वच वक्त्यांना बोलण्यासाठी वेळ कमी मिळाला अशी उपस्थितांची सार्वत्रिक भावना होती. मात्र साहित्य व समाजकार्य या दोनही क्षेत्रांतील अनेक छोटी-मोठी दालने दिसली, अशी भावना उपस्थितांपैकी बहुतेकांची होती.

महाराष्ट्रातील अन्य विद्यापीठांनी, महाविद्यालयांनी, सामाजिक संघटनांनी, सामाजिक संशोधन करणाऱ्या संस्थांनी व सर्व प्रकारच्या प्रसारमाध्यमांनी दलवाईंचे विचार व कार्य पुढे घेऊन जाण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन आयोजक संस्थांच्या वतीने उद्घाटनाच्या वेळी व समारोप सत्रातही केले गेले, त्याला सर्व मान्यवर वक्त्यांनी समर्थन दाखवले. साहित्य अकादमी, नॅशनल बुक ट्रस्ट, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ यांनी याकामी पुढाकार घ्यावा अशा अपेक्षा व्यक्त झाल्या.

**डॉ. नंदकुमार मोरे**
मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
nandkumarvmore@gmail.com
Mob. :9422628300

नवे पुस्तक

अतुल देऊळगावकर

# त्यांनी गिळावे सूर्यासी

‘भविष्यासाठी शुक्रवार’ मुलांचा हा निर्धार ऐकून जर्मनी, ऑस्ट्रिया व स्वित्झर्लंड या देशांमधील वैज्ञानिकांनी ‘भविष्यासाठी वैज्ञानिक’ गट स्थापन केला. मुलांना पाठिंबा देण्यासाठी त्यांनी काढलेल्या पत्रकावर ४६,००० विद्वानांनी सह्या केल्या होत्या. जागतिक पातळीवर कार्यरत असलेल्या ‘ॲम्नेस्टी इंटरनॅशनल’, ‘एर्स्टिक्शन रिबेलियन’, "350.org', "WWB', ‘ग्रीन पीस’, ‘ऑक्सफॅम’ ह्या नामांकित संघटनांमुळे त्यांचे हजारो सभासद सोबतीला आले होते. एरवी जगातील सगळ्या कंपन्या ‘बिझिनेस ॲज युज्वल’ असाच व्यवहार करीत असतात. ब्रिटन व ऑस्ट्रेलियातील काही कंपन्यांनी ‘नॉट बिझिनेस ॲज युज्वल’ असे आशयगर्भ नामकरण करून आघाडी स्थापन केली. पर्यावरणसंकटाचे गांभीर्य लक्षात आलेल्या ह्या कंपन्यांनी त्यांच्या कामगारांना संपात सामील होण्यास प्रोत्साहन दिले.

जगात प्रदूषण करणाऱ्या कोळसा व तेल कंपन्यांचे उत्पादन भरघोस व्हावे, याकरता तंत्रज्ञान पुरविण्यासाठी ‘मायक्रोसॉफ्ट, ‘गुगल’, ‘ॲमेझॉन’ ह्या कंपन्यांचे करार झाले आहेत. यावरून ह्या कंपन्यांमधील कर्मचारी त्यांच्या व्यवस्थापनाच्या विरोधात उभ्या राहिल्या. परिणामी, ‘ॲमेझॉन’चे मुख्याधिकारी जेफ बेझोस ह्यांनी जागतिक बंदच्या एक दिवस आधी ‘हवामानरक्षणासाठी वचनबद्ध’ असल्याचे जाहीर केले. त्यांनी ‘वृक्षलागवड व संवर्धन यासाठी १० कोटी डॉलर’ देणगीची घोषणा केली. तरीही ‘ॲमेझॉन’चे १५०० कर्मचारी, ‘गुगल’ व ‘ट्विटर’चे कर्मचारी मुलांच्या साथीसाठी बंदमध्ये सहभागी झाले होते. काही कल्पक मुलांनी ‘नको ते ॲमेझॉन जळत आहे’ असा फलक रंगवून भावना व्यक्त केल्या होत्या.

जगातील ६० प्रसारमाध्यमांनी ह्या घटनांचे महत्त्व विशेषत्वाने दाखविण्याचा निर्णय घेतला. ‘द गार्डियन’ने संपादकीयात ‘मानवजातीवरील संकटाचे वार्तांकन करताना आम्ही आमच्या जबाबदारीचे भान राखणे आवश्यक आहे. आम्ही पुढच्या पिढीसोबत आहोत,’ असे सांगून स्पष्ट भूमिका घेण्याचे धैर्य दाखवले आहे. अजूनही दूरचित्रवाणी वाहिन्या हवामानबदलाचे संकट प्राधान्याने दाखवत नाहीत.

मुंगी म्हणजे क:पदार्थ जीव! मुंगी सोडून इतर सर्व प्राणिमात्रांना आपण कधी तरी अन् थोडी काही तरी किंमत देतो. मुंगी मरणं हे कुणीही पाप मानत नाही, परंतु या मुंग्यांवरून कवींनी किती कल्पना रंगविल्या आहेत! मुक्ताबाईंनी ‘मुंगी उडाली आकाशी, तिने गिळिले सूर्यासी’, तर नामदेवांनी ‘मुंगी व्याली, तिला शिंगी झाली’ अशी अशक्य कोटीची कल्पनाचित्रे दाखविली आहेत. नाटकात ‘मुंग्यांनी मेरूपर्वत तर गिळला नाही ना?’ असं वाक्य असे. लहान मुलांना ‘मुंगीएवढा जीव’ असे म्हणत ‘मुंगी होऊन साखर खा’ असं सांगितलं जायचं. बा.सी. मर्ढेकर यांच्या प्रख्यात कवितेत ‘मी एक मुंगी, हा एक मुंगी’ असं माणसाला आलेलं रूप दाखवताना अखेरीस ‘या नच मुंग्या, हीच माणसे, असेच होते गांधीजीही...’ असं सांगत बदलाची आशा केली होती. या मुंग्या संपूर्ण जगाला सभ्यता व सुसंस्कृततेचे धडे देत आहेत.

पर्यावरण विनाशाबाबत कुठे, काय, कसे, कधी हे दाखवून त्याचे परिणाम दाखविणाऱ्या बातम्या लिहिल्या वा दाखवल्या जात नाहीत. पर्यावरणीय घटनांचे विश्लेषण केले जात नाही. हे घडवून आणण्यासाठी 'द नेशन', 'कोलंबिया जर्नलिझम रिव्ह्यू' आणि 'द गार्डियन' यांनी माध्यमांचा सहयोग केला आहे. यामध्ये सीबीएस न्यूज, हफिंग्टन पोस्ट, व्होक्स, द इंटरसेप्ट, स्लेट, द फिलाडेल्फिया एनक्वायरर ही मुद्रण, नभोवाणी, दूरचित्रवाणी व डिजिटल माध्यमे सहभागी झाली आहेत. बालकांच्या आंदोलनानंतर प्रसारमाध्यमातील अनेक संस्था पर्यावरणीय बातम्या, लेख आणि संपादकीयांतून अग्रक्रमाने मांडू लागतात व यांचे प्रमाणही वाढवतात. बालकांना आलेले हे यश अपूर्व आहे.

जगातील मुलांची, तरुणांची पर्यावरणविषयक जागरूकता व सक्रियता विलक्षण गतीने वाढत आहे. त्यांच्यासोबतीने मोठेही येत आहेत. पर्यावरण चळवळीला मिळणाऱ्या देणग्यांमध्ये वाढ होत आहे. हरित पक्षांना मिळणाऱ्या मतांमध्ये वाढ होत आहे. हे पाहून, सर्व प्रकारच्या माध्यमांतील अग्रगण्य असलेल्या बी.बी.सी., वॉशिंग्टन पोस्ट, न्यूयॉर्क टाइम्स, लॉस एंजलिस टाइम्स, नॅशनल जिओग्राफिक, नेचर ह्या संस्था म्हणू लागल्या, 'हा आहे ग्रेटा थुनबर्ग इफेक्ट!'

ग्रेटा ही जगातील पर्यावरण चळवळीची राजदूत झाली त्या वेळी तिच्यावर टीकेचे हिंस्र हल्लेदेखील सुरू झाले. उजव्या विचारांचे व धर्मांध म्हणू लागले : 'डाव्या–उदारमतवादी विचारांच्या प्रसारासाठी अब्जावधी खर्चून जनसंपर्क माध्यमांच्या मदतीने उभी केलेली ग्रेटा ही एक कळसूत्री बाहुली आहे. आत्ममग्न व विषण्णतेच्या विकाराची ग्रेटा ही हेकेखोर, एकसुरी आवाजात बोलणारी असून तिला गांभीर्याने घेणे हाच एक विनोद आहे.' तसेच कडव्या डाव्यांकडून ग्रेटा ही हरित (ग्रीन) कंपन्यांची ब्रँड असल्याची टीका चालू झाली. कॅनडा येथील पत्रकार व पर्यावरणकार्यकर्त्या कोरी मॉर्निंगस्टार यांनी 'सहमतीसाठी–ग्रेटा : विनानफा उद्योग संकुलांचे राजकीय अर्थशास्त्र' या लेखातून कडाडून टीका केली. 'बाजारपेठेला प्रत्येक गोष्टीत विक्रीमूल्य दिसते. विक्री सुलभ होते म्हणूनच जाहिरातांमध्ये लहान मुलांचे महत्त्व वाढले आहे. ग्रेटा व तिच्या पाठीमागे येणाऱ्या मुलांमुळे अनेक पर्यावरणस्नेही वस्तूंचा खप वाढला. हे लक्षात घेतले तर मागे वळून पाहताना सामाजिक माध्यमांतून ग्रेटाची प्रतिमा कशी मोठी करीत नेली, हे लक्षात येते. ह्यातून काही मूलभूत बदल होणार नाही, त्यांनी केवळ बदलाचा आभास निर्माण होईल.' असे म्हटले आहे. ह्या सर्व टीकेला जगातील आघाडीच्या वृत्तपत्रे अग्रलेखातून वेळोवेळी उत्तर देत असतात.

दि.२४ सप्टेंबर २०१९ रोजी जगातील बालकांच्या वतीने १६ बालकांनी संयुक्त राष्ट्रसंघाकडे धाव घेतली. दि.२० नोव्हेंबर १९८९ ला न्यूयॉर्कमधील परिषदेमध्ये १४० राष्ट्रांनी बालकांचे हक्क मंजूर केले होते. त्यानुसार जगातील प्रत्येक बालकास कुठल्याही प्रकारचा भेदभाव न करता सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक हक्क मिळाले पाहिजेत. यासंबंधी कुठल्याही बालकाची तक्रार आल्यास तिचे निवारण करण्यासाठी तटस्थ तज्ज्ञांच्या विशेष समितीने संबंधित राष्ट्रामध्ये जाऊन चौकशी करावी, असे नमूद करण्यात आले आहे. ३० वर्षांपूर्वी बहाल करण्यात आलेल्या ह्या हक्कांची जाणीव १६ बालकांनी करून दिली. ५ खंडांतील १२ राष्ट्रांतून हवामानबदलाचे चटके सहन करणारी बालके संपूर्ण जगातील बालकांचे प्रतिनिधित्व करीत होती. ८ ते १७ वर्षे वयोगटातील ह्या पथकात भारताची रिधिमा पांडे, अमेरिकेची अलेक्झांड्रिया व्हिलसेनॉर, मार्शल बेटाचा रॅन्टॉन ॲन्जैन ही बालके होती. ग्रेटा ही कधीच व्यक्तिकेंद्रित वा आत्मगौरवपर भूमिका घेत नाही; उलट ती सातत्याने इतर देशांत कार्यशील असणाऱ्या मुलांना सोबत नेते व त्यांना श्रेयदेखील देते. 'भविष्यासाठी शुक्रवार हे जगातील बालकांचे आंदोलन असून देशोदेशींची मुले यात पुढाकार घेत आहेत.' याचा ती वारंवार उल्लेख करते. ग्रेटाने याची प्रचिती पुन्हा एकदा आणून दिली.

(जगातील बालकांच्या वतीने संयुक्त राष्ट्रसंघाकडे तक्रार दाखल करताना पहिली ग्रेटा, तर पाचवी रिधिमा)

गंगा नदीला येणारे वारंवार पूर पाहून भयभीत झालेल्या हरिद्वारमधील ११ वर्षांच्या रिधिमा पांडेने २०१७ मध्येच राष्ट्रीय हरित लवादाकडे दाद मागितली होती. त्यात 'हवामानबदलाचे परिणाम रोखण्यासाठी भारत सरकार पुरेशी पावले उचलत नाही. त्यांनी विज्ञानाच्या आधारे कृती करावी, असे आदेश द्यावेत' असे म्हटले होते. राष्ट्रीय हरित लवादाने तिची मागणी फेटाळून लावताना, 'पर्यावरणहानी मूल्यांकन (एन्व्हायर्न्मेंटल इम्पॅक्ट असेसमेंट) केल्यानंतरच योजना कार्यान्वित होत असते. याचिकेमध्ये ह्या प्रक्रियेला आव्हान देण्यात आलेले नाही' असे म्हटले. त्यानंतर

रिधिमाने सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागितली आहे. आता तिला 'भारताची ग्रेटा' संबोधले जाते. ती म्हणाली, ''गंगा नदीला आम्ही माता म्हणत राहतो, परंतु तिला किती वाईट वागवतो? अजूनही ती अतिशय गलिच्छ आहे. कपडे धुणे, शहरांची व कारखान्यांची घाण, प्लॅस्टिक, मृतांच्या रक्षा– सर्व काही गंगार्पण केले जाते. वर पर्वतांवर जंगलतोड चालतच राहते. हवामानबदलाच्या काळात थोडा पाऊस आला तरी पूर येतो. प्रचंड हानी होते. हे थांबवले पाहिजे. मला माझे, आमच्या पिढीचे आणि पुढील पिढ्यांचे भविष्य सुरक्षित करावयाचे आहे.''

ब्राझीलमधील कॅटरिना लॉरेन्झो (वय १२) म्हणाली, ''आमचं भविष्यच नाही, तर वर्तमानदेखील धोक्यात आलं आहे.'' समुद्राच्या पाणीपातळीतील वाढीमुळे प्रशांत महासागरातील ४४ चिमुकली बेटे बुडण्याचा धोका आहे. पालाऊ नामक बेटावरील कॅरोलस मॅन्युअल म्हणाला, ''हवामानबदलामुळे सर्वाधिक असुरक्षितता आम्हीच सहन करीत आहोत. समुद्र आमची एकेक घरे गिळंकृत करीत आहे. श्रीमंत देशांना हेच आमचे सांगणे आहे.'' अलास्काच्या बर्फाळ प्रदेशातील युपिआख ह्या आदिवासी जमातीचा १७ वर्षांचा कार्ल स्मिथ वडिलधाऱ्यांकडून शिकार व मासेमारी शिकला आहे. 'आमची जीवनशैली नाहीशी होत आहे.' अशी धास्ती तो बोलून दाखवत होता. इबे बेटाचा रॅन्टॉन ॲन्जैनच्या कथनातून, 'चक्रीवादळ व पाणीपातळीतील वाढ ह्यामुळे आमचे बेट हैराण आहे.' ही भीती व्यक्त होती. २०१८ मध्ये कॅलिफोर्नियाच्या जंगलात पेटलेल्या वणव्यामुळे पसरलेल्या धुराने १३ वर्षांच्या अलेक्झांड्रिया व्हिलसेनॉरला दम्याचा त्रास सुरू झाला. जंगलातील अग्नीच्या रौद्ररूपाने ती चिंताग्रस्त झाली. तिची शारीरिक व मानसिक प्रकृती बिघडली. तिला महिनाभर रुग्णालयात राहावे लागले. या काळात तिला ग्रेटाच्या आंदोलनाविषयी माहिती मिळाली आणि तीदेखील सक्रिय झाली. तिने 'भविष्यासाठी शुक्रवार' आंदोलन संपूर्ण अमेरिकेत पसरवले. नायजेरियाची राजधानी लागोसमध्ये सलग ८ महिने पाऊस व पूर सहन केल्यानंतर तिथे डेंग्यू, हिवताप यांनी थैमान घातले. त्यात प्रदूषित हवा व पाणी यांची भर पडून अनेक रोग पसरले. याची थेट झळ डेबोरा ॲडेग्बिले (वय वर्षे १२) याला पोहोचली. दमा, डेंग्यूच्या आजाराने त्याला अनेक वेळा रुग्णालयात राहावे लागले. दक्षिण आफ्रिकेच्या केपटाऊनने २०१८ च्या मार्चमध्ये




अवर्षणामुळे पिण्याच्या पाण्यासाठी 'शून्य दिवस' (डे झीरो) अनुभवला आहे. या वर्षी तिथे पुराने धुमाकूळ घातल्याने रहिवाशांवर गलिच्छ पाणी पिण्याची वेळ आली. तिथून आलेला आयखा मेलिथाफा 'आफ्रिकी हवामान आघाडी'चा सदस्य असून २०३० पर्यंत दक्षिण आफ्रिकेने कर्ब उत्सर्जनात ९० टक्क्यांनी कपात करावी यासाठी कृतिशील झाला आहे. ट्युनिशियाच्या टाबार्कामध्ये जंगलाचे वणवे एकाएकी वाढले. २०१७ मध्ये १४६ आगी लागल्या. रॅल्सेन बेली (वय १७ वर्षे) हिचे घर कसेबसे वाचले, पण तिच्या शेजारची अनेक घरे आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. पाठोपाठ महापुराच्या कहरामध्ये जनजीवन १२ दिवस ठप्प झाले. अर्जेंटिनाच्या हाएडोतून आलेली शिआरा साच्चीने विश्वास बसणार नाही, अशा भयानक वेगाच्या वाऱ्यासह वादळांची साक्षीदार आहे. जर्मनीच्या हॅंबर्गमधील रायना अव्हॅनोव्हा हिने उष्णतेच्या लाटेमुळे आणि त्यानंतर आलेल्या पुरामुळे झालेले हाल पाहिले आहेत.

हवामानबदलाच्या सर्व तऱ्हांचे तडाखे सहन करणारी पुढील पिढी संयुक्त राष्ट्रसंघाकडे त्यांची कैफियत घेऊन गेली. त्यांनी कर्ब उत्सर्जनाचे प्रमाण अधिक असणाऱ्या अर्जेंटिना, ब्राझील, फ्रान्स, टर्की व जर्मनी ह्या राष्ट्रांच्या विरोधात तक्रार दाखल केली. त्यात 'या राष्ट्रांच्या वर्तनामुळे बालकांच्या हक्कांचे उल्लंघन होत आहे,' असे म्हटले आहे. बालकांच्या पथकाने ''अमेरिका, चीन व सौदी अरब ह्या देशांनी 'बालकांचे हक्क' मंजूर करणाऱ्या करारावर सही

केली नसल्यामुळे त्यांच्या विरोधात तक्रार देता येत नाही'' हे स्पष्ट केले. बालकांच्या पथकाचे नेतृत्व करणारी ग्रेटा म्हणाली, ''हवामानसंकट हे केवळ तापमानापुरतेच मर्यादित नाही. त्यामुळे अन्न व पाण्याचा तुटवडा भासतो, रोगराई वाढते. आपल्या कल्पनांपेक्षाही भयंकर वास्तव दिसत आहे. यापुढील विनाश टाळावयाचा असेल, तर आताच तातडीने पावले उचलणे आवश्यक आहे.''

तात्पर्य- 'तुम्ही आमच्या भविष्याची माती करीत आहात.' (यू आर शिटिंग ऑन अवर फ्युचर) असा फलक २० सप्टेंबरच्या मोर्चात दिसत होता. जगातील बालकांच्या मनातील हीच भावना हे सोळा प्रतिनिधी व्यक्त करीत होते.

मागील काही वर्षांपासून पर्यावरणसंकटाविषयीची जागरूकता वाढत आहे. सोफी, ज्युलियाना व ग्रेटा ह्या निमित्तमात्र आहेत; परंतु ह्या छोट्यांमुळे पर्यावरण व हवामानबदल हे विषय घराघरांपर्यंत पोचले. १९६२ मध्ये राशेल कार्सन यांच्यामुळे पर्यावरणजागृतीचा पाया रचला गेला आणि ग्रेटाने त्यावर कळस चढवला आहे. तिने सोप्या पण थेट शब्दांत, 'तुम्ही हवामानसंकट निर्माण करणारे व आम्ही ते सहन करणारे' अशी विभागणी केली. प्रदूषणकर्ते आणि प्रदूषणग्रस्त, पर्यावरणमस्त व पर्यावरणत्रस्त ही मांडणी केली. त्यामुळे पर्यावरण चळवळीच्या मागणीला धार आली. प्रदूषण करणाऱ्या कंपन्यांच्या विरोधातील वातावरण तापत चालले आहे. संपूर्ण जगातील मुले 'हे विश्वाचे अंगण, आम्हा दिले आहे आंदण' ही 'बी' (नारायण मुरलीधर गुप्ते) यांची कविकल्पना साक्षात उतरवण्याची किमया करीत आहेत. ('चाफा बोलेना' ह्या अभिजात कवितेचे कवी 'बी' (नारायण मुरलीधर गुप्ते) यांच्या हयातीत त्यांचा एकही काव्यसंग्रह प्रसिद्ध होऊ शकला नाही.) 'आमच्या विश्वाच्या अंगणाला तुम्ही बिघडवलेले आहे, ते तत्काळ सुधारा'- हे ठणकावून सांगणाऱ्या मुलांच्या संख्येत होणारी लक्षणीय वाढही आनंददायी आहे.

ग्रेटामुळे जनसामान्यांमध्ये परिवर्तन घडून येत आहे, असे अनेक दिग्गजांना वाटत आहे. नॉर्वे सरकारने २०१९ च्या शांततेच्या नोबेल पुरस्कारासाठी १६ वर्षांच्या ग्रेटा थुनबर्ग हिचे नाव सुचविले आणि त्यालाही जगभरातून प्रचंड समर्थन मिळत गेले. अनेक वृत्तपत्रांनी संभाव्य मानकरी असा तिचा उल्लेख केला. या काळात ग्रेटाला नोबेल मिळावे की मिळू नये, यावर अनेक रकाने भरून चर्चा झाली. ठरल्याप्रमाणे ११ ऑक्टोबर रोजी घोषणा झाली. पारंपरिक शत्रुराष्ट्र एरिट्रियाशी युद्ध टाळून मैत्री करणारे इथिओपियाचे पंतप्रधान अबी अहमद अली यांना २०१९ चा शांततेसाठीचा नोबेल सन्मान बहाल करण्यात आला. त्यानंतर 'ग्रेटाला का डावलले?' यावर खल सुरू झाला. ह्या मतमतांतरांना बाजूला ठेवणेच योग्य आहे. नोबेलचा गलबला चालू होण्याआधीच तिला पर्यायी नोबेल बहाल करण्यात आले होते.

स्वीडन येथील दानशूर जॅकॉब व्हॉन युक्सकुल यांनी जागतिक पातळीवर असामान्य कार्य करणाऱ्या 'द राइट लाइव्हलीहूड पुरस्कार' १९८० मध्ये सुरू केले. त्यांचे 'आम्ही जागतिक समस्या सोडविण्यासाठी कार्यरत धीरोदात्त व्यक्तींना सन्मान आणि पाठबळ देतो' हे ब्रीद आहे. ही संस्था दर वर्षी आंतरराष्ट्रीय मानवी हक्क, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, शाश्वत विकास आणि शांतता प्रस्थापित करणाऱ्या ४ व्यक्तींची निवड करीत असते. ह्या क्षेत्रांत कार्य करणाऱ्यांचा 'नोबेल' समिती विचार करीत नाही. म्हणून 'द राइट लाइव्हलीहूड पुरस्कारांना 'पर्यायी नोबेल' (अल्टरनेट नोबेल) असेही संबोधन प्राप्त झाले आहे. मानचिन्ह व २ लाख युरो (सुमारे १.५६ कोटी रुपये) असे ह्या पुरस्काराचे स्वरूप आहे. पर्यावरणस्नेही बांधकामासाठी ख्यातनाम वास्तुशिल्पी हसन फादी यांना 'द राइट लाइव्हलीहूड' पुरस्कार १९८० मध्ये बहाल करण्यात आला होता. अहमदाबाद येथील गांधीवादी नेत्या इलाबेन भट आणि महिलांचे सक्षमीकरण करणारी त्यांची संघटना 'सेवा' ह्यांना हा सन्मान १९८४ मध्ये देण्यात आला होता. १९९१ मध्ये ' विकास योजनांचे स्वरूप हेच निसर्ग व माणूस यांचा विनाश करणारे आहे' अशी मांडणी करीत मोठ्या धरणांविषयी मूलभूत प्रश्न उपस्थित करणाऱ्या 'नर्मदा बचाव आंदोलनास' गौरवण्यात आले होते. २०१४ मध्ये पर्यावरण पत्रकार बिल मॅककबिन व त्यांची संघटना 350.org आणि अमेरिकतील अनेक गैरव्यवहार चव्हाट्यावर आणणारे एडवर्ड स्नोडेन व पाकिस्तानमधील महिला कार्यकर्त्या आस्माँ जहांगीर यांना हा पुरस्कार देण्यात आला होता. यंदा मारोक्को व पश्चिम सहारा भागातील आफ्रिकी महिलांच्या हक्कांसाठी शांततेच्या मार्गाने लढणाऱ्या अमिनातु अली हैदर, ब्राझीलमध्ये ॲमेझॉनचे अरण्य व आदिवासी यांच्यासाठी लढणारे डावी कोपेनाव्हा यॅनोमामी, चीनमधील महिलांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या

गुओ जिअॅन्मी आणि ग्रेटा थुनबर्ग यांना २०१९ चे 'राइट लाइव्हलीहूड' पुरस्कार जाहीर झाले. जगातील बालकांच्या कृतिशीलतेला आणखी एक जगन्मान्यता प्राप्त झाली. 'राइट लाइव्हलीहूड फाउंडेशन'ने ही घोषणा करताना ''वैज्ञानिक वास्तव सांगत हवामानसंकटासाठी कृती आवश्यक आहे, या मागणीसाठी पाठबळ वाढविण्याचे आणि प्रेरणा देण्याचे कार्य करणाऱ्या ग्रेटाविषयी आदर व्यक्त करीत आहे,'' असे म्हटले आहे.

मागील एक वर्षात स्वत:ची जीवनशैली आणि सभोवताल या दोन्हींत बदल करण्यासाठी सज्ज होणाऱ्यांच्या संख्येत झपाट्याने वाढ होत आहे. 'पैशासाठी आयुष्य' हेच ध्येय असणाऱ्या काळात पैसा सोडून निसर्ग वाचविण्यासाठी व्यक्ती व संस्था ह्या दोन्हींच्या संख्येत झपाट्याने वाढ दिसू लागली आहे. वैयक्तिक पातळीवर कर्ब पदचिन्ह कमी करणे व सभोवतालच्या संस्थांना त्यासाठी भाग पाडणे, ही महत्त्वाची कृती होताना सर्वत्र दिसत आहे. युरोप, अमेरिका व ब्रिटनमध्ये घेतलेल्या सर्वेक्षणात 'हवामानबदल' व 'पर्यावरणरक्षण' या विषयांना प्राधान्य देणाऱ्या मतदारांमध्ये प्रचंड वाढ झाल्याचे आढळले आहे. जगातील मुलांमुळेच पर्यावरण कृतिवादाचे (अॅक्टिव्हिझम) नवे युग अवतरले आहे. हीच परिवर्तनाची नांदी आहे. जगावरील कार्बनच्या काळ्याकुट्ट ढगांना मुलांच्या कृतिवादामुळे चंदेरी किनार आली आहे. हे वातावरण असेच टिकणे व आणखी पसरणे आवश्यक आहे. हा प्रतिसाद पाहून येथून पुढे दर तीन महिन्यांनी हवामानासाठी जागतिक बंद साकारण्याची घोषणा मुलांनी केली आहे. निदर्शकांच्या संख्येत किमान पटीपटीने वाढ होत गेली आणि मुलांच्या समवेत तरुणही वाढत्या संख्येने येत गेले, तर जगावरील काळे ढग आणखी बाजूला सरकू लागतील. परंतु त्यांचा लढा हा संपूर्ण जग व जागतिक संस्था ताब्यात असलेल्या कॉर्पोरेट कंपन्यांशी असल्यामुळे हे कार्य महाकठीण आहे. प्रदूषकांच्या विरोधात सुरू असलेल्या ऐतिहासिक लढ्यात प्रदूषकशाहीचा वरवंटा वाढत गेल्यास सिव्हिलायझेशनच्या तसेच जीवसृष्टीच्या अंताकडे ती वाटचाल असेल. हे अजिबात होऊ नये याकरता छोटेच त्यांच्या वयापेक्षा मोठे होऊन जिवाच्या आकांताने लढत आहेत; प्रश्न आहे तो मोठ्यांचा! त्यांनाही 'शहाणपण' आले तर... सध्या चालू असलेल्या प्रयत्नांचे गतिवर्धन झाले तर... जगावरील काळी कभिन्न छाया दूर होणे शक्य आहे.

मुंगी म्हणजे क:पदार्थ जीव! मुंगी सोडून इतर सर्व प्राणिमात्रांना आपण कधी तरी अन् थोडी काही तरी किंमत देतो. मुंगी मरणं हे कुणीही पाप मानत नाही, परंतु या मुंग्यांवरून कवींनी किती कल्पना रंगविल्या आहेत! मुक्ताबाईंनी 'मुंगी उडाली आकाशी, तिने गिळिले सूर्यासी', तर नामदेवांनी 'मुंगी व्याली, तिला शिंगी झाली' अशी अशक्य कोटीची कल्पनाचित्रे दाखविली आहेत. नाटकात 'मुंग्यांनी मेरूपर्वत तर गिळला नाही ना?' असं वाक्य असे. लहान मुलांना 'मुंगीएवढा जीव' असे म्हणत 'मुंगी होऊन साखर खा' असं सांगितलं जायचं. बा.सी. मर्ढेकर यांच्या प्रख्यात कवितेत 'मी एक मुंगी, हा एक मुंगी' असं माणसाला आलेलं रूप दाखवताना अखेरीस 'या नच मुंग्या, हीच माणसे, असेच होते गांधीजीही...' असं सांगत बदलाची आशा केली होती. सध्या जगातील अनेक मुलांनी चालवलेल्या चळवळीमुळे आपण कविकल्पनांच्या जवळ जात आहोत. या मुंग्या संपूर्ण जगाला सभ्यता व सुसंस्कृततेचे धडे देत आहेत. कोट्यवधी मुंग्यांनी आकाशी उडावे व सूर्यासी गिळावे, त्यातून अत्यवस्थ पृथ्वीस संजीवनी मिळावी आणि नवा उष:काल व्हावा, अशीच सर्व जगाची अपेक्षा आहे.

**अतुल देऊळगावकर,** लातूर
atul.deulgaonkar@gmail.com
Mob. 9049999054

**ग्रेटाची हाक**
**अतुल देऊळगावकर**
मनोविकास प्रकाशन, पुणे
पृष्ठे २०८, किंमत : २५० रुपये

(मागील वर्षी पर्यावरणाच्या क्षेत्रात जगभर चर्चेत राहिली ती स्वीडनची ग्रेटा ही १४ वर्षांची मुलगी आणि तिच्या प्रेरणेतून उभी राहिलेली जगभरातील मुला-मुलींची आंदोलने या पार्श्वभूमीवर पर्यावरणाचे अभ्यासक अतुल देऊळगावकर यांनी लिहिलेले 'ग्रेटाची हाक' हे पुस्तक मनोविकास प्रकाशनाकडून येत आहे. या पुस्तकाचे प्रकाशन ४ जानेवारी २०२० रोजी पुणे येथे ज्येष्ठ लेखिका वीणा गवाणकर आणि अभिनेते अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते होत आहे. त्या पुस्तकातील हे एक प्रकरण.)



**गांधींचे गारूड । ४**

संजीवनी खेर

# प्रेमदिवाणी – मीरा (मार्गारेट स्लेड)

> पण का कोण जाणे, ते नाते विवाहात परिवर्तित झाले नाही. तिच्या आयुष्यात पती, मुलं, संसार ही पोकळी कायम राहिली. गांधीजींशी जवळीक हवी होती; पण ते उच्च नैतिकतेने वागत होते, जे त्यांच्या दृष्टीने सहज होते. मीराबेन मात्र त्यासाठी उत्कटतेने वाट पाहत असायची. गांधींच्या पायाशी राहावे, त्यांची सेवा करावी हे तिला हवे होते; पण हीसुद्धा एक आसक्तीच होती. त्यांनी ही आसक्ती दूर करायला सांगूनही तिला ते जमत नव्हते. तिचं आयुष्य एक चक्रव्यूह बनलं होतं. ती त्यात स्वेच्छेने शिरली. मीरेच्याच उत्कटतेने तिने निवडलेल्या देवाच्या कल्पनेत रममाण झाली. पण... तो वेगळ्याच दुनियेचा रहिवासी होता. रोमाँ रोलाँने म्हटल्याप्रमाणे 'दुसरा ख्रिस्त' होता. त्याच्या प्रत्येक विचाराने ती भारावलेली होती. तिच्यासारखी दुसरी कुणी नव्हती आणि नाही.

गांधींच्या प्रेमात आकंठ बुडालेली ही देखणी, अभिजनात वावरणारी मॅडलिन स्लेड. समाजात दरारा असलेले तिचे घराणे. वडील ब्रिटिश नौदलाचे ॲडमिरल– सर एडमंड स्लेड. साहजिकच तिचा शब्द झेलायला कनिष्ठ, वरिष्ठ अधिकारी सतत सज्ज असत. राहणी साहजिकच संपन्नतेची, वावर बड्या राजकारण्यांत, समाजातील प्रतिष्ठितांत. जीवन तसे हौसे-मौजेत जाऊ शकले असते, पण मॅडलिनचे चित्त कशातच रमत नव्हते. तिला आध्यात्मिक गोष्टींची ओढ होती. तिच्या वडिलांची दोन वर्षांसाठी हिंदुस्तानात बदली झाली होती. सारे जण मुंबईला राहत होते. वडिलांच्या नौदलातील इतमामाला शोभेलसे त्यांचे जीवन होते. रोज नवनव्या अभिजन, प्रतिष्ठित लोकांच्या सहवासात संध्याकाळ जाई. मेजवान्या, भटकणे, लोकांशी संवाद, ऐटीत राहणे हे सारे सत्ताधारी सत्तेचे महत्त्व ठसवणारे आयुष्य चालले होते.

मॅडलिनचे चित्त मात्र रमत नव्हते. आपल्याला नक्की काय हवेय ते उमगत नव्हते, म्हणजे काय हे कळत नव्हते. घरच्यांना सोडून ती युरोपात निघून गेली. तिचा जीव निसर्गात रमे. पानं, वृक्ष, प्राणी, घोडे, गाई यांच्या सहवासात तिला आनंद वाटे. जणू ते तिच्याशी बोलत असत. निसर्ग तिचा खरा सखा होता. तिच्या आजोळच्या वातावरणात तिचा जीव प्रसन्न असे. कुठल्या तरी हाकेची ती वाट पाहत होती. संगीतात रुची होती म्हणून बिथोविनचे संगीत शिकली. त्यात प्रगती केली, रमली. सूरांतून ती संगीताच्या पलीकडे जाऊन संगीतकाराला शोधत होती. तो तिला जाणवला, तेव्हा तिने गुडघे टेकून देवाचे आभार मानले. आपण त्याच्या काळात जन्मलो असतो, तर किती छान झाले असते! तिने त्याच्या संगीताचे अनेक कार्यक्रम आयोजित केले, त्यासाठी खूप भटकली. बिथोविनच्या गावाला जाऊन राहिली. तरी अस्वस्थता कमी होत नव्हती. बिथोविनचे प्रेम हे तिच्या आयुष्यातले एक आनंददायी पर्व होते. पहिले महायुद्ध पेटले होते. सर्वत्र द्वेष, तिरस्काराचे वातावरण होते. ज्या संगीतकारावर जीव जडवला, तो जर्मन-ऑस्ट्रियन होता.

असे स्वच्छंद परीचे आयुष्य जगणारी तरुणी! कुणी स्वप्नात तरी विचार केला असेल का, की ही कधी कुडाच्या घरात राहील? चटईवर निजेल? शाकाहारी अन्न खाईल नि

भणंगासारखी रानी-वनी भटकत तेथील लोकांची सेवा करील? पण हे सारे घडलंय. ज्यांच्या सत्तेविरुद्ध हिंदुस्थानात सत्याग्रह सुरू झाला होता, त्या नेत्याच्या बाजूला ती उभी होती आणि त्या सत्तेच्या अत्युच्चपदी तिचा पिता काम करीत होता. किती वदतोव्याघात वाटावे अशी स्थिती होती! पण हे सत्य होतं. तशीही ती घरच्यांच्या (तसं तर मनाला पटल्याखेरीज कुणाच्याच बोलण्यातली) कह्यातली नव्हती. आपल्या वडिलांच्या प्रतिष्ठेला धक्का लागेल का, याचा तिने किंचितही विचार केला नाही; त्यांनीही त्याचा बाऊ केलेला ठाऊक नाही. आपल्या मित्र-मैत्रिणींच्या घोळक्यात ती एखाद्या अस्वस्थ आत्म्यासारखी हरवल्यागत वावरायची. काही तरी वेगळं करण्यासाठी धडपड करायची. पण काय ते सुचत नि सापडत नव्हतं. एका पुस्तकाने तिच्या आयुष्याची दिशाच बदलली. त्या क्षणाबद्दल ती लिहिते, 'जसजसे मी ते पुस्तक वाचत गेले, माझ्या मनात एका तेजस्वी सूर्याच्या किरणांचा प्रकाश पसरू लागला. त्याने मी दिपून गेले. सत्याचा सूर्य पूर्ण तेजाने तळपू लागला आणि जीवनात काय करायचे, ते प्रेयस अचानक मिळाले. हे घडलं १९२३ मध्ये रोमाँ रोलाँ यांच्या गांधींवरील पुस्तकाने.'

तिने या अलौकिक माणसाला भेटायचा निर्णय घेतला. त्या अगोदर तिने आश्रमजीवनाची माहिती करून घेतली आणि तिच्या उतावळ्या स्वभावाप्रमाणे बोटीचे रिझर्व्हेशनही केले. पण आश्रमाची जीवनशैली वाचल्यावर तिला जाणवले की, अचानक इतका बदल आपल्याला झेपणार नाही. भारतीय आश्रमजीवनाचा सराव तिने आपल्या घरीच सुरू केला. मद्यपान बंद केले, शाकाहार सुरू केला, जमिनीवर मांडी घालून बसायचा सराव सुरू केला, सूतकताईची प्राथमिक माहिती करून घेतली. गांधींच्या 'यंग इंडिया' साप्ताहिकाची वर्गणी भरून टाकली आणि २० पौंड दान म्हणूनही पाठवले.

जितकं काही मी गांधी या माणसाबद्दल वाचतेय, तितकं त्याचं गूढ वाढतेय. ते काही उकलत नाहीय. त्याची तत्त्वं आकर्षक होती म्हणून, की त्याचं वागणं पारदर्शक होतं म्हणून स्त्रियांना त्यांच्या वागण्याने विश्वास वाटे. या माणसापुढे त्या इतक्या मोकळ्या कशा होत? तो 'त्या' अर्थाने आकर्षक



नव्हता किंवा 'तसं' वाटावं असं सूचक वागतही नव्हता. तरी तरुण, सामाजिक प्रभावी वर्तुळातील घरातल्या तरुणी घरदार सोडून झोपडीत राहायला का येत होत्या? अशीच ही एका ब्रिटिश ॲडमिरलची देखणी, मनस्वी कन्या... भारतासारख्या मागासलेल्या देशात का येते? एक पुस्तक तिचे जीवन पार उलटसुलट कसे करू शकते? बिथोविनच्या संगीतात आकंठ बुडालेली ही तरुणी रोमाँ रोलाँने लिहिलेलं गांधींचं चरित्र वाचते काय आणि प्राणांतिक ओढीने सर्वसंग परित्यागाच्या भावनेने हिंदुस्थानात येते काय- सारेच एखाद्या परिकथेत वा गूढकथेत शोभावे असे आहे.

सुधीर कक्कर या मनोविश्लेषकाने मीराबहेन आणि गांधी यांच्या परस्परसंबंधांबद्दल कादंबरी लिहिलीय. गांधींचा खून झाल्यानंतर ती जेव्हा ऑस्ट्रियाला एकांतवासात राहत होती, तेव्हा घेतलेल्या मुलाखती, तर काही काल्पनिक जोड देऊन, पण सत्यतेला धरून लिहिलेल्या 'मीरा आणि महात्मा' या पुस्तकात म्हटले आहे की- या दोन तीव्र, उत्कट, प्रतिभाशाली व्यक्तींमध्ये तितकीच तीव्र अशी ओढ निश्चितच होती. कक्कर नोंदवतात : हे संबंध अनेक स्तरांवर गुंतागुंतीचे होते. गांधींना स्त्रियांच्या सहवासात बरे वाटे, आवडे. पण ते पुरुषी अर्थाने आवडणे वा सहवास हवा असणे, असं अजिबात नव्हतं. तर, ते एका स्त्रीने दुसऱ्या स्त्रीबद्दल आस्था वाटावी, सहजता असावी असं असे. त्यात त्यांना सखीभाव महत्त्वाचा वाटे. ते अनेकदा म्हणत की, मी स्त्री म्हणून जन्मायला हवं होतं.

मेडलिनने गांधींना दुसरे दैवत मानले असले तरी दोघांमध्ये जे प्लेटॉनिक आकर्षण होते, ते शब्दांपलीकडचे होते. गांधींनाही तिच्याबद्दल आकर्षण वाटतच होते. पण ते स्वत:वर संयम ठेवूनच वागत होते. ते तिला रागावत, त्यांच्यापासून दूर पाठवत. त्यामुळे ती अतिशय व्याकूळ होत असे. मानसिक रीत्या पार कोसळत असे. चक्क आजारी पडत असे. तिला गांधींभोवती सतत राहायला आवडे. तासन्‌तास ती त्यांच्या अवतीभोवती राहायला उत्सुक असे. कस्तुरबांची सगळी कामे- जसे की गांधींना जेवण देणं, हवं-नको पाहणं, त्यांचे तळवे चोळून देणं ही कामं- करण्यात तिला समाधान मिळे.

या दोन विलक्षण स्वभावाच्या नि उच्च नैतिकतेचा स्वीकार केलेल्या व्यक्तींमधील संबंध हे शारीरिक स्तरावर कधीच जाऊ न देण्याचं श्रेय गांधींना दिलं पाहिजे. तिच्या मते- गांधीजी हे एक पवित्र आत्मा, निखळ शुद्ध व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्यासाठी ती काहीही करायला सज्ज असे. कुठलंही काम तिच्यासारख्या स्त्रीला (जेव्हा ती आश्रमात रहायला आली तेव्हा ती काही नवथर तरुणी नव्हती, ३३ वर्षांची स्त्री होती) करणं अशक्य नव्हतं. कल्पना करा- तिची ॲडमिरलच्या प्रासादातील स्नानगृहं घ्या; वा श्रीमंत आजोबा-आजीच्या बंगल्यातील स्वच्छतागृहे घ्या, ती आजच्या पंचतारांकित हॉटेलसारखी होती. आणि इथं? तट्ट्याचे संडास, न्हाणीघर चार चटयांचा आडोसा. त्यात पाण्याचा तुटवडा असेल तर तांब्याभर पाण्यात भागवणे असे होते. अशात गांधींच्या आश्रमात सगळी सफाई स्वत:ची स्वत:च करायची शिस्त होती. तिची सर्व काही करायची आनंदाने तयारी होती.

गांधींना तक्रारीला काही जागा राहू नये, अशी तिची धडपड असे. हे का? तर, त्यांनी तिच्यावर खूश राहावे म्हणून. हे गांधीजींच्या लक्षात येत नव्हते? येत होते. तिच्यासारखी कामाला पक्की कुणी कार्यकर्ती विदेशी स्त्री नाही, असे ते म्हणत. तिनं आदर्श अनुयायी व्हावं- भक्त होऊ नये, असा त्यांचा तिला उपदेश असे. म्हणून ते तिच्यावर रागावर असत, तिच्याशी कठोरपणे वागत, तिला स्वत:पासून दूरच्या ठिकाणी पाठवून देत. या दोन उत्कट भावाकुल व्यक्तींमधील परस्परनातेसंबंध आकळणे अवघड होते. उलट गैरसमजाला भरपूर वाव देणारे होते. त्यांचा राग ओढवून घेत ती त्यांच्या समीप राहण्याची प्राणांतिक धडपड करायची, निराश व्हायची, हतबलता व्यक्त करायची, आजारी पडायची, तरीही गांधीजींचा शब्द मोडायची नाही. या विरहात तिला त्यांच्या पत्रातील हळुवार अक्षरांचा आधार असे. 'तू विचाराने नेहमीच माझ्या मनात असतेस. देहाने माझ्याजवळ असण्यासाठी तू इथे आलेली नाहीस. तुला जे काम करायचं आहे, ते चांगल्या प्रकारे सिद्ध करण्यासाठी हा विरह गरजेचा आहे. देहाचे जवळ असणे हे महत्त्वाचे नाही, असा हा विरह पुढील प्रदीर्घ विरहाची तयारी असते. नि:संगपणाची शिस्त बाळग. आज आपण दूर झाल्याने तुला मी दु:खात टाकले, पण ते अटळ होते. तू एक सामर्थ्यशाली स्त्री हो. मला चिकटून राहण्याचा मानसिक दुबळेपणा टाकून दे. या देहाखेरीज माझा आत्मा तुझ्याबरोबर आहे. तू तुझी उदासीनता सोडून दे. शरीराखेरीज आत्मा आपल्या अनेक मर्यादांवर मात करायला शिकवू शकतो. तुझ्यात ती शक्ती आहे. माझा मोह टाळ. मी दोषरहित मुळीच नाही. तू तुझं व्यक्तिमत्त्व झळाळून टाकेल असे सामर्थ्य अंगीकार. तितकी तू हिम्मतवान आहेस.' - गांधीजी.

'स्पिरिटस पिलग्रिमेज' या तिच्या आत्मकथनातून.

तिने पूर्वायुष्य त्यागून हिंदुस्थानात येणं, सर्वार्थाने इथलं होण्यासाठी त्यागाची परीसीमा गाठणं– हे पाहून गांधीजींनी तिला मीराचे नाव दिले होते. संत मीरेसारखी तिची निष्ठा होती, प्रेमातील वेडेपण होतं, कामासाठी वाट्टेल ते करायची तयारी होती.

ती फ्रंटियर प्रॉव्हिन्समध्ये काम करीत असताना, तिच्या आयुष्यात पृथ्वीसिंग नावाचा निधड्या छातीचा, उंचापुरा पंजाबी पुरुष खूप जवळ आला होता. अगोदर क्रांतिकारक विचारांचा असलेला हा तडफदार तरुण. त्याच्या क्रांतिकारी कामामुळे ब्रिटिशांनी त्याला तुरुंगात डांबले होते. तिथून तो निसटला आणि १६ वर्षे भूमिगत होता. त्याच काळात तो अहिंसेचे पालन करणाऱ्या गांधींच्या सान्निध्यात आला. नंतरच्या काळात गांधींच्या विचारांनी काम करू लागला होता. दोघे एकमेकांकडे आकर्षित झाले होते. त्याचे बेधडक, निर्भय वागणे तिला लोभावून गेले. तिला जी शारीरिक जवळिकीची ओढ होती, ती विनाअडथळा त्याच्या सहवासात पुरी होऊ शकणार होती. संसार, मुलं या गोष्टींची तिला ओढ वाटू लागली. गांधीजी तिला आपल्यापासून सतत दूरच ठेवत होते. पृथ्वीसिंगच्या पुस्तकाच्या इंग्रजी अनुवादावरून हात फिरवण्यासाठी दोघे वारंवार भेटू लागले होते. तिला वाटले की, आता आपण या व्यक्तीबरोबर मोकळेपणाने, निर्भीडतेने, स्वतंत्रपणे (जसे गांधीजींनी सांगितले होते) काम करू शकू. सेवाग्राममधील विविध कामांकरिता ते एकत्र येत. त्याच्या सहवासासाठी ती व्याकूळ होत होती.

तिने लिहून ठेवले आहे, 'त्या काळात माझी अवस्था समुद्रातल्या एका छोट्याशा नौकेसारखी झाली होती. मनातले तुफान सारखे उफाणत होते. गांधीजींनीही या नात्याला स्वीकृती दिली होती. त्यामुळे तर मला खूपच उत्साहित झाल्यासारखे वाटत होते... तिचा हात आणि जबाबदारी पृथ्वीसिंगवर सोपवायला मला आनंद होतोय, कारण ते दोघे एकमेकांच्या प्रेमात बुडालेले आहेत.'

पण का कोण जाणे, ते नाते विवाहात परिवर्तित झाले नाही. तिच्या आयुष्यात पती, मुलं, संसार ही पोकळी कायम राहिली. गांधीजींशी जवळीक हवी होती; पण ते उच्च नैतिकतेने वागत होते, जे त्यांच्या दृष्टीने सहज होते. मीराबेन मात्र त्यासाठी उत्कटतेने वाट पाहत असायची. गांधींच्या पायाशी राहावे, त्यांची सेवा करावी हे तिला हवे होते; पण हीसुद्धा एक आसक्तीच होती. त्यांनी ही आसक्ती दूर करायला



सांगूनही तिला ते जमत नव्हते. तिचं आयुष्य एक चक्रव्यूह बनलं होतं. ती त्यात स्वेच्छेने शिरली. मीरेच्याच उत्कटतेने तिने निवडलेल्या देवाच्या कल्पनेत रममाण झाली. पण... तो वेगळ्याच दुनियेचा रहिवासी होता. रोमाँ रोलाँने म्हटल्याप्रमाणे 'दुसरा ख्रिस्त' होता. त्याच्या प्रत्येक विचाराने ती भारावलेली होती. तिच्यासारखी दुसरी कुणी नव्हती आणि नाही.

तिने आपल्या स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वाची कामगिरी बजावली होती. गांधींच्या पायाशी आपलं अस्तित्व समर्पित करून ती स्वस्थ बसली नव्हती. गांधीजी तिची पत्रं आश्रमातील इतर स्त्रियांना वाचायला देत असत. तिचं मीरेसारखं सर्वस्व अर्पण करून भारतात येणं, आपले अगोदरचे बंध तोडून इथल्या कामाशी नातं जोडणं– हा सर्वस्वाचा त्याग त्यांना मोलाचा वाटत होता. अनेक देशव्यापी

कामं कार्यकर्त्यांची वाट पाहत होती. गांधींची प्रतिमा युरोपात ठळक करायची, हिंदुस्थानचा लढा कोणत्या मार्गाने चालला आहे, मुद्दे काय हे सारे युरोपच्या जनतेला कळण्यासाठी तेथील चर्चिल-जनरल स्मटसारख्या मोठ्या नेत्यांना भेटून समजावणं, वृत्तपत्रांशी संपर्क साधणं यासाठी ती गांधीजींबरोबर गोलमेज परिषदेला गेली होती. इथल्या अहिंसक चळवळी कशा दडपून लोकांवर ब्रिटिश सरकार अत्याचार करतंय, हे ती स्वदेशी कळवायची. त्यामुळे तिच्यावर बारीक लक्ष होतं तिला मुंबईला यायला बंदी होती. ती मोडून ती इथं कामं करायची, मग तिला अटक व्हायची.

तिच्यासारख्या प्रतिष्ठित घरातील स्त्रीने वसाहतीतील एका अर्धनग्न फकिरासाठी देश, माणसं सोडून फाटक्यासारखे राहणे, यावर युरोपातील वर्तमानपत्रांतून तिच्यावर तिरकस लिहिलं जातं होतं. त्याला तिने सणसणीत उत्तर दिलं होतं--'मी कुणाच्या सांगण्यावरून वा बोलावण्यावरून हिंदुस्थानात गेले नाहीये. तिथं माझं काही भव्य स्वागत झालेलं नाही. मी माझ्या मर्जीनं, पूर्ण विचारांती तिथे गेले आहे. माझा धर्म, घरदार, माणसं मी मुळीच सोडलेली नाहीत; उलट तिथे गेल्यावरच मला माझा धर्म जास्त नीट कळला आहे. मी धर्म बदललेला नाही. जे काही करतेय, पूर्ण समजून करतेय. इथे स्वैर वागावे म्हणून आलेले नाही. एका अत्यंत शिस्तबद्ध अशा आश्रमात मी राहतेय.'

काँग्रेस कमिटीत ती महत्त्वाच्या पदांवर कामं करत होती. इतर नेत्यांशी तिला चांगला संपर्क होता. अस्पृश्यता निवारण असो, खादीविस्तार असो- तिने सगळ्यात जीव ओतून काम केलं. त्यासाठी तिने स्थानिक भाषा शिकून लोकांशी नातं जोडलं. सहकार चळवळीत तिचा सहभाग होता. चळवळीत भाग घेतल्यामुळे तिला कैदेत राहावे लागले होते. सेवाग्राम आश्रम स्थापन करण्यात तिचा मोठा सहभाग होता. ओरिसातील लोकांबरोबर तिने खूप काम केलं. तिला १९४२ च्या सुमारास गांधीजी, कस्तुरबा, महादेवभाई यांच्यासह पुण्याला आगाखान पॅलेसमध्ये ठेवण्यात आले होते. तिथून सुटल्यावर तिने किसान आश्रम स्थापन केला. त्यानंतर रुडकीजवळच्या खेड्यात आश्रम सुरू केला. गांधीजींच्या खुनानंतर तिने ऋषीकेश आणि भिलंगनाला बापूग्राम व गोपाल आश्रम सुरू केला. तिथे तिने गोपालन, दुग्धव्यवसाय आणि शेतीविषयक अनेक प्रयोग केले. कुमाऊ भागात राहताना, हिंडतांना तिला जाणवले की, हिमालयीन प्रदेशातील बेफाम जंगलतोडीमुळे तेथील पर्यावरणाची अपरिमित हानी होत होती. नद्यांना पूर येऊ लागले होते. वन खात्याने केलेल्या अक्षम्य दुर्लक्षाने गांधीजींच्या मार्गाने तिथे 'वृक्ष बचाव' याकरता १९८० मध्ये चिपको आंदोलन सुरू झाले!

गांधीजींसह ती युरोपात गेली असताना ते दोघे रोमाँ रोलाँना भेटायला गेले होते. तेव्हा रोलाँनी लिहिलेले बिथोविनचे चरित्र तिला भेट दिले होते. संपूर्ण जीवन भारतात घालवून, तो देश स्वतंत्र झालेला पाहून, फाळणीचा रक्तपात नि गांधीहत्येचा धक्का पचवून तिने पुन्हा बिथोविनच्या देशात शांतपणे आयुष्य घालवायचा निर्णय घेतला. ऑस्ट्रियातील एका खेड्यातील एकांतवासात तिने आपले उर्वरित आयुष्य घालवले. आपल्या आत्मवृत्तात तिने गांधीजींबरोबरच्या आयुष्याबद्दल बरेच लिहिले आहे. ती इथे होती, तो काळ गांधींच्या जीवनातील अपरिमित घटनांचा नि संघर्षाचा होता. तिने हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्यलढ्याविषयीही लिहिले. पण तिच्या जीवनात गांधीविचारच अखेरपर्यंत प्रबळ राहिला.

तिच्याबद्दल लिहिताना मनात एक असीम अस्वस्थता दाटली आहे. या उत्कट, अलौकिक समर्पण वृत्तीने बापूंच्या पायाशी आलेल्या स्त्रीच्या वाट्याला उदासी का आली? तिला परमेश्वरी कृपेत आस्था होती. 'तो' काय मार्ग दाखवील तो मी अनुसरेन, असं गांधींच्या जाण्यानंतर ती सतत म्हणत राहिली. पण तिचा जीव इथे लागेना! तिच्या 'पशुलोक' आश्रमामध्ये ती मुक्या जिवांची अलोट करुणेने उपचारासह देखभाल करीत राहिली. एका सेवकाला म्हणाली, 'मी प्राण्यांवर अधिक माया करते, हे खरंय; पण मी माणसांवर काय कमी जीव पाखडला?'

बिथोविन, गांधी, पृथ्वीसिंग... कुणालाच दोष देऊन तिला न्याय मिळणार नाही! आपण तिला न्याय देणारे कोण? ती मनस्वी स्त्री आपल्या अटींवर जगली. हवे ते, पटेल ते सर्वस्व ओतून केलं. गांधीजींनी तिच्यावर 'बा नि बापू' बनून अंत:करणापासून, तिचं हित डोळ्यांसमोर ठेवून माया केली. तिच्या आत्मवृत्तातून, पत्रांतून ती अत्यंत पारदर्शकतेने समोर येते. पण मनाला उगीचच चुटपूट लागते. तिच्या मीरापणाचे हे भागधेय म्हणू?

**संजीवनी खेर**, मुंबई ४०००१४.
sanjeevanikher@gmail.com
Ph : 022-24141669, 9821411472

अभिवादन

# मला भेटलेला देवदूत

## वसंत आळेकर

१९४२ च्या ऑगस्ट क्रांतीचे ते मंतरलेले दिवस होते. मी साधारण वीस बावीस वर्षांचा असेन. मला व माझ्या सहकाऱ्यांना त्यावेळी अटक होऊन आम्ही सर्वजण येरवड्याच्या मध्यवर्ती तुरुंगात (काही स्थानबद्ध व काही अंडर ट्रायल असे) कैदी होतो. त्यानंतर पूज्य साने गुरुजी यांनासुद्धा अटक होऊन येरवड्याच्या तुरुंगात आणण्यात आले आहे अशी बातमी आली. त्या वेळी आम्ही सर्वजण बावरलेल्या मनस्थितीत होतो. एकीकडे गुरुजींबरोबर राहायला मिळणार म्हणून आनंद वाटत होता, तर दुसरीकडे त्यांना पकडल्यामुळे चालू असलेल्या चळवळीचे मोठे नुकसान होणार म्हणून वाईट वाटत होते.

माझी आणि गुरुजींची थोडीसुद्धा ओळख नव्हती. फक्त त्यांचे ऐकून होतो व थोड्या फार प्रमाणात त्यांच्या कार्याची जाणीव होती. त्यांच्या कामाची पद्धत व निरलसपणा यांचा माझ्या मनावर फार चांगला ठसा उमटला होता. त्यांच्या स्वभावावरून, त्यांनी केलेल्या कामावरून व त्यांच्याबद्दल दुसऱ्यांकडून ऐकलेल्या गोष्टींवरून हा माणूस किती मोठा असला पाहिजे, याची कल्पना मनात सारखी येत होती. गुरुजींची व आपली ओळख व्हावी, त्यांच्याशी आपल्याला बोलायला मिळावे, असे सारखे वाटत होते. याआधीच आपण त्यांच्या परिवारात का आलो नाही, याची खंत पण वाटत होती.

आमचे तुरुंगातील दिवस थोरा-मोठ्यांच्या सहवासात चांगले जात होते, पण माझी व त्यांची ओळख काही होईना! एके दिवशी (कोणता दिवस होता ते आठवत नाही) संध्याकाळी आम्ही राहत असलेल्या तीन नंबर बराकीच्या पटांगणात गुरुजींचे भाषण होते. ते ऐकल्यावर तर त्यांच्या मोठेपणाची कल्पना आली व त्यांच्याबद्दलचा आदर अजूनच वाढला.

मी आणि माझे सहकारी यांना कॅपिटॉल टॉकीज व वेस्टएंड टॉकीज बॉम्ब खटला व नंतर महाराष्ट्र कटासंबंधी अटक झाली होती. पोलीसदल हे खटले चालू करायच्या खटपटीत होते. एके दिवशी मला येरवडा तुरुंगातून परत कॅन्टॉन्मेंट लॉकअपमध्ये पाठवण्याचा आदेश आला व त्याप्रमाणे कॅन्टोन्मेंट लॉकअपमध्ये एका लॉकअपमध्ये ठेवले. दुसऱ्या दिवशी आणखी एका गृहस्थांना संध्याकाळच्या सुमारास मी असलेल्या लॉकअपमध्ये ठेवण्यात आले. ते गृहस्थ कोण असावेत याची काही कल्पना नव्हती. अंधारामुळे काही दिसलेही नाही. नंतर काही वेळाने दिवे लागले, तेव्हा पाहतो तो काय, माझ्या लॉकअपमध्ये ज्यांची ओळख व्हावी म्हणून मी तळमळत होतो ते साक्षात् साने गुरुजी अगदी माझ्या शेजारीच उभे होते. त्यावेळी झालेल्या आनंदाला कसली उपमाच देता येणार नाही. माझी आणि गुरुजींची ओळख झाली. जवळ-जवळ मध्यरात्रीपर्यंत आम्ही बोलत होतो. म्हणजे बहुतांशी तेच बोलत होते आणि मी ऐकत होतो. त्यातून त्यांची देशप्रेमाची तळमळ, माझ्यासारख्या तरुण सहकाऱ्यांविषयी असलेली आत्मीयताही छान प्रत्ययाला येत होती. त्यानंतर जवळ-जवळ एक आठवडा आम्ही एकाच खोलीत होतो. हा काळ माझ्या आयुष्यातला सर्वांत आठवणीत राहील असा गेला. ती शिदोरी व त्यातील वैचारिक धन पुढे आयुष्यभर पुरले! त्यातील एक दिवस तर फारच अद्‌भुतरम्य ठरला. तो दिवस विलक्षण होता, यात शंकाच नाही.

त्याचे असे की, आम्हाला पकडण्यात पोलीस इन्स्पेक्टर श्री.रोच हे मुख्य होते. (श्री.रोच हे फार सज्जन गृहस्थ होते. त्यांना स्वातंत्र्य चळवळीविषयी फार सहानुभूती होती. पुढे तुरुंगातून सुटल्यावर त्यांनी हरिभाऊ लिमये यांच्याबरोबर जो सतत संपर्क ठेवला यावरून हे समजून येते).



वसंत आळेकर



साने गुरुजी

श्री. रोच यांनी मला त्या दिवशी साधारण सकाळी दहा वाजता त्यांच्या कार्यालयात आणून बसवले. मला वाटले काही चौकशी करण्याकरता असेल. मी एका कोपऱ्यात होतो. थोड्या वेळाने एक ख्रिस्ती बाई येऊन श्री.रोच यांच्या टेबलाजवळील खुर्चीवर बसल्या. (नंतर समजले की त्या बाई म्हणजे श्री.रोच यांच्या पत्नी होत्या.) नंतर श्री.रोच आपल्या पत्नीला म्हणाले की, 'तुला जर महाराष्ट्रातील एक सगळ्यात चांगला देव माणूस बघायचा असेल तर मी तुला दाखवतो.' प्रत्यक्ष इंग्लिश शब्द होते, If you want to see a 'saint' of Maharashtra.. . असे म्हणून श्री.रोच स्वतः लॉकअपमध्ये गेले व साने गुरुजींना आपल्या कचेरीत आणून सन्मानाने आपल्याजवळ बसवले. श्री.रोच आपल्या पत्नीला म्हणाले, 'हा बघ तुझा Saint त्याला नमस्कार कर.' तिनेही अगदी खाली वाकून गुरुजींना नमस्कार केला. या प्रसंगाला मी साक्ष असल्यामुळे माझ्यासाठी तो दिवस अगदी संस्मरणीय ठरला.

आपल्या वागणुकीने व आचरणामुळे माणूस आपला प्रभाव आपल्या शत्रूवरसुद्धा कसा पाडू शकतो, याची मूर्तिमंत प्रचिती साने गुरुजींमुळे त्या दिवशी आली.

साने गुरुजींच्या सहवासाची ही शिदोरी पुढे आयुष्यभर पुरली व आपले आचरण कसे असावे याचा एक वस्तुपाठच मिळाला.

**तळटीप :**

आमचे वडील वसंतराव आळेकर हे स्वातंत्र्य सैनिक होते. त्यांचा जन्म १९२० साली झाला आणि २००० साली त्यांचे निधन झाले. १९४२ च्या कॅपिटॉल बॉम्ब केसमध्ये ते एक आरोपी होते. ते येरवडा जेलमध्ये अंडर ट्रायल असताना, साने गुरुजींच्या सहवासात आले व त्यांनी ही हकीकत लिहून ठेवली होती. दोन वर्षांपूर्वी आमची आई (श्रीमती उषा आळेकर, ज्या स्वतःही स्वातंत्र्यसैनिक होत्या) जेव्हा गेली, तेव्हा त्यांची कागदपत्रे आवरताना हा लेख सापडला.

**सुधीर आळेकर**
salekar@hotmail.com
Mob. 9922940142

# SkinSense
Skin & Laser Clinic

Using science to enhance youth and delay ageing.



**Dr. Abhijit Desai**
Cosmetic Dermatologist and Laser Specialist



**Dr. Gauri Desai**
MD, Laser Specialist

## Medical State of the Art LASERS

- Skin Toning
- Face Lift & Skin Tightening
- Reduction of Snoring
- Permanent Hair Reduction
- Acne Scar Reduction
- Tattoo Removal
- Pigmentation Treatment
- Vaginal Tightening
- Spot Fat Reduction and Body Sculpting
- Pore Minimisation
- Texturing

**Tel no.:**
**02224331099 / +919920977940**

**Address:**
2nd floor, Marathe Udyog Bhavan, Appasaheb Marathe Marg, Prabhadevi, Mumbai – 400028

**Email:** dr.skinsense@gmail.com | **Website:** www.yourskinsense.com

**Registered** Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP- 6 /31-12-2020
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ Postal Registration No. PCW/080/2018-2020
Posted at PUNE PSO GPO 411001 / EveryThursday, Date of Posting : 2-1-2020 / Date of Publication : 2-1-2020

## निमंत्रण

रविवार, दि. १२ जानेवारी २०२०,
सकाळी ११ वाजता
पत्रकार भवन, नवी पेठ, पुणे ३०



# कहाणी माहिती अधिकाराची

या पुस्तकाचे प्रकाशन
लेखिका : अरुणा रॉय
अनुवाद : अवधूत डोंगरे

यावेळी अरुणा रॉय यांची मुलाखत घेतील वीणा जामकर. याचवेळी 'दलपतसिंग येती गावा' या नाटकाची निर्मितीप्रक्रिया आणि नाट्यसंहिता या दोन पुस्तकांचे प्रकाशन होईल. तीनही पुस्तके साधना प्रकाशनाकडून येत आहे.

---

रविवार, १२ जानेवारी २०२०, सायंकाळी ५ वाजता
टिळक स्मारक मंदिर, टिळक रोड, पुणे ३०

# महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) साहित्य व समाजकार्य पुरस्कार

## वितरण समारंभ

प्रमुख अतिथी : अरुणा रॉय

साहित्य क्षेत्रातील चार व समाजकार्य क्षेत्रातील चार अशा एकूण आठ पुरस्कारांचे वितरण यावेळी होईल.

संयोजक
मासूम (पुणे)
आणि
साधना ट्रस्ट (पुणे)